TIGHT BINDING BOOK

TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY
TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY

OU_192314

UNIVERSAL
LIBRARY

# मन्द-ज्योति

लेखक

वसंत हरी कटककर.

बी. ए.

१० ऑक्टोबर ] किंमत १। रुपया [ १९४०

– प्रकाशक –
गो. रा. पाटणकर,
कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस,
टिळक रोड, पुणे २.

[ पुढील आवृत्तीचे हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

–· मुद्रक :–
विष्णु गंगाधर केतकर,
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणे २

# मन्द-प्रकाश

मराठी वाङ्मय आजकाल निरनिराळ्या वाङ्मय-पुष्पानी भूषविले जात आहे हे पाहून कोणाचेही अत करण अभिमानाने भरून येईल गेल्या दोन तीन वर्षांत माझ्यासारखे अनेक तरुण लेखक धाडस करून या प्रातात आले आहेत.

कादबरी, नाटक, शास्त्रीय वाङ्मय वगैरे दिशानीं वाङ्मयाची प्रग ीच होत आहे त्याचबरोबर लघुनिबध, गुजगोष्टी, सुनीते, इत्यादि छोटे प्रकारही बरेच आघाडीवर जाऊ लागले आहेत

माझ्या पहिल्या ' फवारे ' पुस्तकात मी लघुकथा, विनोदी लेख, नाट्यछटा इत्यादीचा समावेश केलेला होता वाचकाना रुचि-पालट म्हणून ते पुस्तक बरेच आवडले तेव्हा तसाच प्रयत्न पुन करण्याचे धाडस केले व हा सग्रह प्रसिद्ध करीत आहे

लघुतम कथाचा या पुस्तकात मुद्दाम अतर्भाव केलेला आहे. हत्याराचा कायदा, कारण ? इत्यादि.

त्याचप्रमाणे यात समाविष्ट केलेल्या बारा नाट्यछटा शक्य तितक्या निर्दोष लिहिण्याचा प्रयत्न केला आहे

वाचकानी आणि टीकाकारानी मला माझे दोष प्रेमळपणानें दाखविले तर त्याचा माझ्या पुढील लेखनावर चागलाच परिणाम होईल अर्थात् या पुस्तकात मी कोणतीही गभीर

भूमिका घेतलेली नाही. थोडा वेळ करमणूक व्हावी, हास्य-विनोद निर्माण व्हावा इतकीच अपेक्षा मी करीत आहे. अर्थात् याची ग्वाही वाचकानी द्यावयाची आहे तेव्हा मी हे पुस्तक त्याच्याच हातात देतो

सध्याच्या महागाईच्या दिवसात कॉंटिनेटल् बुक् सर्व्हिस्चे मालक श्री. गो रा. पाटणकर यानी हे पुस्तक प्रकाशित करण्याची जोखीम घेतली याबद्दल त्याचे खरोखर प्रथम आभार मानले पाहिजेत.

लोकसग्रह छापखान्याने अगदी जलदीने हे पुस्तक सुदर छापून दिल्याबद्दल त्याचेही आभार मानणे अवश्य आहे

२९६ सदाशिव पेठ,
पुणे २
दि. २० ऑक्टोबर, १९४०

**व. ह. कटककर**

प्रिय आजोबा व आजी —

कै० ती० दादासाहेब अंजनगांवकर

आणि

वहिनी

यांच्या स्मृतीस

# मन्द-ज्योति

लघुकथा

* *

शब्दचित्रें

* *

विनोदी लेख

* *

लघुनिबंध

* *

लघुतम कथा

* *

नाटयछटा

* *

इ० इ०

काँटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २

# साक्षरता-प्रसार ◆ ◆ ◆ १

उमलपूर या गावातील सर्व लोकाची पाचावर धारण बसली होती ते गाव काही समुद्रकिनाऱ्याजवळ नव्हते की शत्रूच्या विमानाचा हल्ला होण्याची तेथल्या लोकाना भीति वाटावी पण हळू हळू लोक ते गाव सोडून चालले होते आणि ज्याना काही कारणाने तेथे राहणे प्राप्तच होते ते कसेबसे जीव घेऊन तेथे दिवस कठीत होते

कारण, त्या गावात एक विलक्षण साथ उद्भवली होती आणि त्यापुढे गावकऱ्यानी हात टेकले होते ती साथ फार भयकर होती एकदा लोक त्याला बळी पडू लागले की, त्यावर उपचार कोणताच चालत नसे. शिवाय ती साथ विशेषत सुशिक्षित लोकामध्ये फार झपाट्याने फैलावली होती त्यामुळे लेख, व्याख्याने, आणि साप्ताहिके याच्या द्वारे गावाच्या आसपास, त्या जिल्ह्यात आणि सबध प्रातात ती केव्हा पसरेल याचा नियम नव्हता यामुळे सरकारी अधिकारी पेचात पडले होते सध्याच्या युद्धात हिटलर जितका विचारात पडला नसेल किवा ब्रिटिश प्रधान-मडळ जितक्या कसोशीने लढाईला तोड देण्याचा प्रयत्न करीत नसेल तितक्या बारकाईने, विचाराने, धैर्याने, आणि धिमेपणाने लोक या साथीशीं झगडत होते

आतापर्यंत प्लेग, कॉलरा, देवी या साथी पुष्कळदा येऊन गेल्या. लोकाच्या त्या अगवळणी देखील पडल्या डॉक्टरानी त्याच्यावर बगले बाधले, पण ही साथ मात्र विलक्षण होती एक वेळ मेनिंजाइटस् बरा पण मेंदूचा हा रोग नको असे म्हणण्याची पाळी आली कारण, ती साथ पाढरपेशा लोकात होती अन् शिकलेले बेकार लोक त्या साथीने पछाडले गेले होते.

पुण्याला नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी साथीचा उपद्रव होतोच. बारा महिने तेथे कसली तरी साथ चालू असते पोहणे, फिरावयाला गटाने जाणे, पोरीची टिंगल, व्याख्यानमाला, साप्ताहिक काढणे, श्लील-अश्लील वाद, पावित्र्य-विडबन, आजचे तरुण उद्याचे म्हातारे, उच्च आणि हुच्च समेलन, सततिनियमन, बाळतपणाचे दवाखाने, फेडरेशन, स्त्रियाचा सवता सुभा—एक ना दोन—अगदीच काही नसले तर शनिवारवाड्यापुढे घसा दुखेपर्यंत व्याख्यान देणे असे उपद्व्याप—तुम्ही उद्योग म्हणा पाहिजे तर—चालू असतात

पण तरी सुद्धा उमलपुरातल्या त्या साथीची वार्ता पुण्याला येऊन थडकल्यावर काही पेन्शनराचे ब्लडप्रेशर वाढले काही 'पुरोगामी मडळी' सभा घेण्याचा विचार करू लागली भागानगरच्या चळवळीसारखी एकादी चळवळ करावी असे काही सदाशिवपेठी सस्कृतीच्या लोकाचे मत पडले

ती साक्षरता-प्रसाराची मोहीम होती आणि सरकारने तिला उत्तेजन दिल्यामुळे मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्याच्या बायकातून त्या चळवळीचे पेव फुटले होते अनायासे राजनिष्ठा प्रकट होऊन वाहवा होईल या भावनेने कित्येक 'हपिसर' आपल्या 'अर्धांगी'ला आतून उत्तेजन देत होते· ज्याना चार ओळी पत्ता लिहिण्याची सुद्धा अक्कल नव्हती अशा बायका या चळवळीमुळे गावात विदुषी म्हणून गणल्या जात होत्या. त्यातून नुकत्याच बदलून आलेल्या मामलेदाराची बायको इग्रजी पाचवी नापास इतकी शिकली होती अर्थात् सगळ्या गावात अत्यत विद्वान् म्हणून ठिक-ठिकाणी स्त्रियाच्या सभेला अध्यक्ष, चिटणीस इ० इ० करता त्याची योजना होणे अगदी अपरिहार्य होते सरकारने साक्षरताप्रसार सुरू केल्या-बरोबर एकदम कमलाबाईना—मामलेदारीणबाईंना—आपण लहानपणी अक्षर गिरवल्याची आठवण झाली, व इतराना आपण थोडे ज्ञान द्यावे व साधल्यास त्याच तालुक्यात प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रात फोटो छापावा अशी इच्छा झाली पैसा दिल्याने सपतो, पण ज्ञान 'उणे न होता सदैव वाढतसे' या उक्तीप्रमाणे ही ज्ञानदानाची पोयी त्यानी आपल्या बगल्यात सुरू केली.

विद्यार्थ्यांना तोटा नव्हता गावातल्या दोनतीन कारकुनाच्या बायका,

एक दोन झाडुवाल्या व स्वत च्या दोन लहान मुली इतक्या सरजामानिशी वर्ग सुरू झाला

एक डझन पाट्या ( लिहिण्याच्या ), अर्धा डझन उजळणीची पुस्तके इतक्या भाडवलावर विद्वत्तेचे प्रदर्शन माडता आले तर कोण नाकारील ? कारण कमलाबाईना विदुषी होण्याची हौस होती व एकाद्या रविवारी ज्ञानप्रकाशात फोटो येण्याची महत्त्वाकाक्षा होती शिवाय वदली झाल्यावर सर्वांनी फीस्ट द्यावी असा 'आतला' आवाज सागत होता कमलाबाईंची महत्त्वाकाक्षा हिटलर, मुसोलिनी, किवा स्टॅलिन याच्या तोडीची होती विमाएजट ज्याप्रमाणे या परमेश्वराच्या सृष्टीतील प्रत्येक मानव आपली 'केस' आहे असे गृहीत धरून चालतो, आणि सर्व दुनियेचा विमा उतरवू ( मग त्याच्या पॉलिसी स्वर्गात देण्याची सोय केली आहे असे सागायला देखील तो कमी करणार नाही ) अशा जगावर उपकार करण्याच्या प्रेरणेने तो काम करीत असतो कोणाही माणसाला काळ-वेळ-स्थळ याच्याकडे दु र्लक्ष करून तो पछाडतो, त्याप्रमाणे कमलाबाई उमलपुरातल्या आबाल-वृद्धाना साक्षर करण्याच्या स्तुत्य उपक्रमापाठीमागे लागल्या होत्या ध्येय वाईट नव्हते, पण मार्ग बिकट होता कारण, कमलाबाईच्या यजमानाच्या हाताखाली जे तीन कारकून होते त्याच्या अडीच बायका, [एक ½ शहाणी किवा half-mad होती, ] दोन झाडुवाल्या व स्वत च्या दोन लहरी मुली इतक्या प्रचड (?) समाजाला त्याना ज्ञानामृत पाजावयाचे होते, त्याना विद्वान् करावयाचे होते पण प्रश्न होता त्या अर्धवट बाईचा उगीच कशाला एकाद्याला नावे ठेवा या दृष्टीने म्हणायचे म्हणूनच त्या बाईला अर्धवट म्हणायचे, नाही तर स्पष्ट इषाराच द्यायचा झाला तर तिच्या बुद्धीने शहाणपणाशी सपूर्ण असहकार केला होता कमलाबाईंनी तिच्या नवऱ्याकडे तिला पाठविण्याविषयी खाजगी फर्मान काढले काय करतो बिचारा. त्याच्यापुढे पेचप्रसग निर्माण झाला खऱ्या परिस्थितीची घोषणा करावी तर ते अगलट येणार, न करावी तर एकदम गभीर परिस्थिति निर्माण होणार त्याने कमलाबाईना सर्व परिस्थिति समजावून सागितली. पण कमलाबाई थोड्या अनुयायावर पुढारी झाल्या होत्या त्यामुळे स्वाभा-

विकच त्याच्या अगी उर्मटपणा आणि बेफिकीरी पूर्णपणे होती घरातली सर्व परिस्थिति समजावून सागून सुद्धा कमलाबाई आपली मागणी एक रेसभरही मागे घ्यावयाला तयार होईनात बायकोला न पाठवल्यास 'इकडे' सागून त्याला डिसमिस् करण्याची धमकी दिली नाइलाजाने त्याने पाठविण्याचे ठरविले दोन दिवस कसेबसे निघून गेले तिसऱ्या दिवशी वेडाच्या भरात तिने सर्व पाटचा फोडून टाकल्या तेव्हा कमलाबाई रागावल्या ते सहन न होऊन तिने सर्वादेखत त्याच्या मुसकटात मारली अर्थात् सर्वादेखत अशी फजीति झाल्यावर कमलाबाईना गावात तोड दाखवण्यास जागाच नव्हती. लौकरच त्या कारकुनाची दुसरीकडे बदली झाली काही घरगुती व मानसिक अस्वास्थ्यामुळे आपला क्लास तूर्त बद ठेवावा लागत आहे अशी कमलाबाई स्वत ची जाहिरात करू लागल्या

—आणि असे कळते की, कमलाबाईच्या यजमानाना बढती मिळून त्याची लौकरच दुसऱ्या जागेवर बदली व्हावी, म्हणून उमलपुरातल्या सर्व गावकऱ्याच्या सहीचे पत्रक सरकारकडे गेले आहे

त्याना मानपत्र व थैली देण्यासाठी निधि जमविण्याची खटपट चालू आहे.

*—नवयुग*

## माणसांच्या जाती ◆ ◆ ◆ २

मी सध्याकाळच्या वेळी फिरावयाला चाललो होतो जनुभाऊची अचानक रस्त्यात गाठ पडली गेल्या पाचसहा वर्षांत तो मला भेटला नव्हता आधीच काळसर असलेला चेहरा गाल वर आल्यामुळे जास्त काळसर वाटत होता. मिशा काढल्यामुळे ओठावर हिरवळ दिसत होती अन् पोटाला प्रमोशन मिळाले होते

'ह, कशी काय तब्बेत? प्रॅक्टिस वगैरे उत्तम आहे न!' मी विचारल वास्तविक तब्बेतीत बिघाड काहीच दिसत नव्हता, पण शिष्टाचार पाळण्याकरिता तसे विचारणे जरूर होते

आता जनुभाऊ रडगाण्याला सुरुवात करणार याची मला खातरी होती कॉलेजात तो सर्वांनाच 'रडया रानडे' या नावाने परिचित होता

केव्हाही चेहऱ्याकडे पहा स्वारीच्या—जगाच लौकरच काही तरी बर वाईट होणार असा चेहरा असायचा बोलण देखील सदा रडक बाळाचा अभ्यास चागला, डोक बऱ्यापैकी, अगात अभ्यासाची धमक, पण परीक्षा जवळ आली, की लागला ज्याच्या त्याच्या जवळ रडायला.

'अरे ते कस होईल रे ... अन् ते कुठ वाचलय् मी ... ते लक्षातच राहात नाही—बहुधा ऑक्टोबरचा चान्स घेणार' त्याच्या या सवयीला आम्ही सरावलो होतो कधी कधी तर मुद्दाम अभ्यासाच्या गप्पा काढून त्याला गहिंवर आणायचा अन् तो गेल्यावर मनमुराद हसत बसायच तसा तो नापास कुठही झाला नाही, पण अगात धमक नाही.

तेव्हा मी इटर-सायन्सला होतो. पुढ मी वकील झालो अन् जनुभाऊ

डॉक्टर झाला कधी कधी त्याच्या पेशटची मला कीव यायची हा कधी एकाद्याला सागेल की तुमच्यावर उपचार करून उपयोग नाही, याचा नेम नव्हता त्यामुळे एकादा तिथल्या तिथेच गतप्राण व्हायचा तसा गृहस्थ मोकळ्या मनाचा, प्रेमळ, पण एकाद्या वेळी मधेच असे एकादे वाक्य उच्चारायचा, की लोक त्याच्याकडे 'आबा' म्हणून बघायचे

'चल की घरीच आता' मी म्हटल

'चल' आम्ही दोघे घरी आलो

'झक्क आहे बुवा तुझ !' मी मुद्दामच म्हटले

'बरय—चाललय थोड फार' जनुभाऊ हसत उद्गारला

'बाकी या दिवसात कठिणच' मी पुन सूचक बोललो

'त्या मानान खरोखरच चागल चाललय' मी आइस्क्रीम झालो जनुभाऊ इतक्या शातपणे बोलू शकतो यावर माझा विश्वास बसेना

'घरच उत्तम आहे?' मी

'ठीक आहे ....आनद आहे तुझ कस काय?' जनुभाऊ म्हणाला

'आपल्याला काय जोरात ढकलायची गाडी' मी म्हटले

'एक गोष्ट विचारू का जनुभाऊ—तुला राग नसेल येत तर विचारतो नाही तर म्हणशील इतक्या दिवसानी भेटला अन् लागला त्रास द्यायला'

'छे छे काय हव तुला—राग कसला आलाय्?' कॉलेजात असताना चिडणारा, त्रासणारा हा प्राणी इतका शात कसा झाला याचा मी विचार करू लागलो

'तुझ्या स्वभावात बराच फरक पडलेला दिसतोय् हे कस काय?'

'हा हा हा दोघातिघानी अगदी अस्सच विचारल—

'त्याची एक लाब हिस्टरीच आहे—जनुभाऊ डॉक्टराच्या नेहमीच्या पद्धतीने सागू लागला : तू वकिलीकडे गेलास अन् मी मेडिकल कॉलेजात गेलो तिथ गेल्यावर मला अनेक गोष्टीचा अनुभव आला बाहेरच्या जगातल्या अनत पटीन दुख तिथ मला पाहायला मिळाली रोगान जर्जर झालेले, मृत्यूशी झुज खेळत असलेले, निव्वळ हाडाचा सागाडा राहिलेले, केवळ बाह्योपचारावर जगलेले ते जीव पाहून मला फार वाईट वाटे

एकादे वेळेस कुणी तरी घाबरत येऊन सागायचा 'डॉक्टर त्याला उचकी लागलीय, लवकर चला' कुणो तरी किंचाळायचे, ओरडायचे, रडायचे ते रोज रोज पाहून मागून मन तयार झाले पहिल्या पहिल्यादा मी रोग्यावर खेकसत असे, पण त्याच्यावर चिडण्यात काही अर्थ नव्हता ते रोगावर चिडले होते, त्याला कटाळले होते मी कितीही रागावलो तरी ते सर्व सविस्तर सागत काही काहीं गोष्टी तर ते मला दहा वेळा बजावीत बर म्हटल तरी पुन तेच मग माझ्या लक्षात आल, की यात त्याचा दोष नव्हता त्याना माझ्याविषयी काही तरी निराळे वाटत होते मीच त्याना या यातनातून सोडवीन याची त्याना खातरी वाटत होती जगण्याची इच्छा त्याना तसे करायला लावी पण त्याना नुसते जगायचे नव्हते, धडधाकट व्हायचे होते किती तरी लोक मला हे खाऊ का, ते खाऊ का असे विचारीत त्याचा अर्थ त्याना जीवनात आनद हवा होता, चागले पदार्थ खायला हवे होते अगदी सुरुवातीला मी मरायला टेकलेल्या एकदोन पेशटना खाडकन् बजावले, की तुमच्यावर उपाय नाही त्यातला एक दुसरे दिवशी धसक्याने गेला व दुसऱ्याने माझी ट्रीटमेंट सोडून दिली

शिवाय मी कॉलेजात असताना आम्हाला जे डॉक्टर सर्जरी शिकवीत त्याच्या व्यक्तिमत्वाचाही माझ्या मनावर फार परिणाम झाला कोणतेही अवघड ऑपरेशन ते अगदी गप्पा मारीत सहज रीतीने करीत 'नर्व्हस' हा शब्दच त्याच्या कोशात नव्हता मृत्यूच्या दारात गेलेले रोगी त्यानी पुन या जगात आणलेले मला माहीत आहेत बोलता बोलता, प्रत्येक पेशटला त्याला आनद वाटेल असे बोलून ते आपले काम करून टाकीत

त्याच्यापासून मी फार महत्त्वाच्या गोष्टी शिकलो उत्तम वकील हा जसा उत्तम नट असावा लागतो तो नुसता कायदेपडित असून चालत नाही, त्याचप्रमाणे उत्तम डॉक्टर हा मानसशास्त्र जाणणारा असावा लागतो हळू हळू मला माझ्या धद्यात नवीन अनुभव येऊ लागले मी माझी परिस्थिति विसरू लागलो आपल्या जगापेक्षा एका निराळ्या जगात मी वावरू लागलो लोकाची ती जगण्याची धडपड, तो आत्मविश्वास, प्रेम हे

पाहून मला निराळी दृष्टि आली मग मला वाटू लागले, की आपण खरोखरच सुखी आहोत

आपल्याच दु खाचा बाऊ करण्यापेक्षा पुष्कळदा दुसऱ्याच्या दु खात सहभागी होण्यात एक प्रकारचा आनद असतो. स्वत च्या दु खातच जे चूर असतात त्याच्याकडे जग दुर्लक्ष करते उलट जो लोकाना सहानुभूति दाखवितो त्याच्याविषयी जगही आस्था बाळगते

म्हणूनच मी माणसाच्या दोन जाती आहेत अस म्हणतो 'रडणारी माणस अन् लढणारी माणस '

माझ्याकडे बाहेर कुणी तरी पक्षकार आला त्यामुळे जनुभाऊला थोडं थाबण्यास सागून मी बाहेर आलो

माझ्या डोळ्यापुढे पूर्वीचा अन् आताचा जनुभाऊ यातले अतर स्वच्छ दिसत होते

—*अप्रसिद्ध*.

# गैरसमज ◆ ◆ ◆ ३

सध्याकाळी बरोबर साडेसहा वाजता मद्रास मेल पुण्याच्या स्टेशनवर उभी राहिली सुट्टी आणि झोन चालू असल्यामुळे गाडीला बरीच गर्दी दिसत होती एकाच दारातून होणारी उतारूची चढउतार, हमालाची धावपळ, चहावाल्या पोराचे ओरडणे, तरुणीचे हसण्याखिदळण्याचे आवाज आणि लाबून कोणी तरी केलेल्या त्या हाताच्या खुणा, ते हलविलेले रुमाल— तो सगळाच देखावा मजेदार होता स्टेशनचे भव्य आवार पाहून काही नवे पाहुणे बिचकलेले दिसत होते टागेवाल्याचा गराडा टाळून पुढे जाणे म्हणजे अभिमन्यूने चक्रव्यूहातून परत येण्याइतके कठिण होते

✣ ✣ ✣

एक छोटी बॅग हातात घेऊन सुरेश खाली उतरला त्याने इकडे तिकडे पाहिले पुन थोडा वेळ त्याने गाडीकडे पाहिले पुन तो चालू लागला नलिनी त्याला कुठेच दिसेना. कदाचित् ती दाराजवळ उभी असेल या कल्पनेने तो तिकिट दाखवून बाहेर आला पण तेथेही ती त्याला दिसली नाही तेव्हा आता पायीच हळू हळू घरी जावे असा विचार करून तो चालू लागला शिवाय वाटेत 'लेडीज् होस्टेल'मध्ये त्याचे थोडे काम होते

✣ ✣ ✣

होस्टेलजवळ आल्यावर त्याने दारावरच्या भय्याजवळ चौकशी केली.

' मिस् सरदेसाई आहेत का ? '

'जरा ठेरो' भय्या आत गेला

'नही वह घुमनेकु गई है' त्याने बाहेर येऊन सागितले.

'बर! हे बडल त्याना दे अन् हे पत्रही दे'

त्याने खिशातून एक पत्र काढले आणि त्याच्या डाव्या कोपऱ्यात From—S D Patwardhan just returned from Bombay, 6–30 असे लिहून पाकीट व बडल भय्याच्या हातात दिले

'विसरू नको बर का' त्याने पुन बजावले

❈ ❈ ❈

'का? काल कुणीकडे गेली होती स्वारी?' सुरेशने नलिनीला विचारले

'तुम्ही काल सकाळीच एकदम मुबईला जाल ही कल्पनाच नव्हती मला मुळी तुमच्या घरी गेले तेव्हा समजल अन् सध्याकाळी लगेच परत येणार तेही समजल'

'बर, आता परवा येईन मला जरूरीच काम आहे थोड अन् उद्या काही अशील येणार आहेत'

'थोडा चहा करून आणते की.' नलिनीने विचारले

'नको नको. Thanks पुन आल्यावर'

'अच्छा......Good-bye . . .'

❈ ❈ ❈

सुरेश ठरल्याप्रमाणे नलिनीकडे गेला पण ती घरीच नव्हती त्याने काही निरोप, चिठ्ठी वगैरे ठेवली आहे का म्हणून विचारिले पण तिने घरात काहीच सागितले नव्हते, तेव्हा तो बुचकळ्यात पडला आजपर्यंत अशी गोष्ट घडली नव्हती. गेल्या दोन वर्षांत असा प्रसग क्वचितच घडला होता एकादे वेळेस ती जरूरीच्या कामाला बाहेर गेली, तर निरोप किंवा चिठ्ठी ठेवून बाहेर जाई, पण आज काहीच नाही तो किंचित् खट्टू होऊन परत निघाला

❈ ❈ ❈

लगेच दुसरे दिवशी सकाळीच तो फिरावयास बाहेर पडला नतर नलिनीकडे गेला.

‘ काय चाललय् ?—सूर्यवशी दिसता तुम्ही लोक ’ त्याने विनोद केला पण नलिनीने त्याला काहीच उत्तर दिले नाही ! ती या ‘बसा’ देखील म्हणाली नाही

‘ का काय विशेष झालय् आज ? ’

‘ ह .’ तिने नुसते ह म्हटले

‘ काय ? ’

‘ ते मला काय ठाऊक ? ’ तिने रागावून त्याच्याकडे पाहिले

‘ काय केल मी ? ’

‘ मला काय ठाऊक ?’

‘म्हणजे हे बर आहे आरोपीवरचा आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादीवर असते ’

‘मी काही वकील नाही तुमच्यासारखी अन् मला तुमच्यासारखे वकिली डावपेचही करता येत नाहीत तुम्ही वकील मात्र एकाची केस हातात घेऊन त्याच वाटोळ करता अन् त्याचेच दात त्याच्या घशात कसे घालता ते समजल आता मला ’

‘काय म्हणतेस तू नलिनी हे ? ही काय बडबड करतेस कसली भानगड आहे ? मला तर काहीच उलगडा होत नाही ’

‘कशाला होईल ? मुद्दाम वेडयाच सोग पाघरल तरी सत्य झाकत नाही माजराला वाटत आपण डोळे मिटून दूध पितो पण जग तिकडे उघडया डोळयानी पाहात असत ’

‘मेहेरबानी करून स्पष्ट सागशील का ? काय ते सरळ बोल मी काही खोट बोलायला निर्ढावलेला साक्षीदार नाही ’

‘पण निर्ढावलेले वकील तर आहात ना ? एकीला लग्नाच वचन देऊन दुसरीशी .’

‘ काय ? काय बोलतेस ?—’ सुरेश एकदम उसळून म्हणाला

‘मला काय प्रेझेंट आणलय् मुबईहून ?’ रोखून नलिनीने विचारले.

‘अस्स ? एवढ्याकरता का ही प्रस्तावना होती  बाकी अलीकडे पुस्तकापेक्षा प्रस्तावनाच लाब लिहितात  बिचाऱ्या लेखकाला मात्र छपाईचा खर्च पडतो ’

‘ह, असा मुद्दा सोडू नका  तुम्ही पुष्कळ फसवाल पण मी फसायची नाही ’

‘Excuse ह  पण मी फक्त तीनचार तास मुबईंत होतो तेवढ्यात कसा वेळ होणार मला ?’

‘दुसऱ्याना प्रेझेंट आणायला तेवढा वेळ होता वाटत ?’

‘कुणाला आणल बुवा मी ?’

‘आता वेड पाघरू नका ’

‘कुणाला ?’ सुरेशने पुन प्रश्न केला

‘शरयू सरदेसाईला ’

‘छे बुवा ! मी नाही काही प्रेझेंट आणल  शिवाय तिला प्रेझेंट कशा-बद्दल द्यायच ?’

‘म्हटल असेल नाताळी भेट नाही तर काही तरी !’ नलिनीने रोखून सुरेशकडे पाहिले  पण त्याचा चेहरा शात होता  भुवया किंचित् वर गेल्या आणि घोटाळ्यात पडल्यामुळे बुबुळाची सारखी हालचाल चालली होती

खालचा ओठ त्याने किंचित् दाबला

नलिनीला वाटले, काय पण पक्का वकील आहे हा  वकील उत्कृष्ट नट असावा लागतो म्हणतात ते काही खोट नाही  महिना दोनशे रुपये उगीच नाही मिळत

‘ए, आता मेहेरबानी करशील का ?—मला स्पष्ट विचार ’

‘तुम्ही शरयूला एक पुडा दिलात ना ? ’

‘हो  ’

‘बरोबर एक बद केलेले पत्र होते, त्यावर From—S. D. Patwardhan अस लिहिलत ना ? ’

‘हो ..’

‘मग आणखीन् कोणता पुरावा पाहिजे ? तुमचा स्वभाव इतका

चचल असेल अस नव्हत वाटल मला माझ्याशी लग्न करायच वचन देऊन...' नलिनी सुरेशकडे रागाने पाहू लागली आता तो लाजेने मान खाली घालील अशी तिची कल्पना

'कुणी सागितल तुला हे ?'

'कुणी का असेना ?'

'तस नाही'

'मग कस ?'

'छे, पण कुणी सागितल ते साग'

'इदू वरतीच खिडकीत उभी होती तुम्ही भय्याजवळ पाकीट अन् बडल दिलेल पाहिल अन् तिला आश्चर्य वाटल तुम्ही गेल्यावर ती खाली आली, तिन पाकिटावरच नाव वाचल त्याच्यावर तुम्ही लिहिल होत Just returned from Bombay अन् बडलाचा कोपरा थोडा फाडून आत बघितल तो आत ब्लाऊझ दिसला आणखी कोणता पुरावा पाहिजे ? अ ? मला वाटत एवढ्या पुराव्यावर तुम्ही एकाद्याला फाशी सुद्धा द्याल ! तुमच्या गोड बोलण्याला मी आतापर्यंत फसले '

सुरेश एकदम मोठ्याने हसायला लागला

नलिनी एकदम गार झाली तिला काहीच उलगडा होईना

'अस्स होय—ती गमत खरच सागायची राहिली तुला.'

'गमत ? खरच, गमत आहे तुमच्या वागण्याची ! तुमची गमत होते पण आमचा जीव जातो याची कल्पना आहे का आपल्याला ? अन् म्हणे स्त्रियाचे कैवारी '

'ऐकून तर घे'

'काही नको घेतल इतक पुरे'

नलिनीच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले होते

❋ ❋ ❋

'हे बघ .सर्व हकीकत सागतो तुला. मी मुबईला ज्या कामाकरता गेलो होतो ते अर्ध्या तासात सपल मग म्हटल, आता जाव कोणाकडे ?

आपला तात्या आजारी होता असं मागं समजलं होतं तेव्हा म्हटलं त्याच्याकडे जावं त्याच्याकडे गेल्यावर त्याची बायको म्हणाली, 'बरं झालं, तुम्ही आलात एवढे दोन ब्लाऊझ शरयूला नेऊन द्या मी तिला पाठवीन म्हटलं, पण पुण्याला जाणारं अलीकडे कोणीच भेटलं नाही' तेव्हा तिनं ते एका पुड्यात घातले अन् एक पत्र लिहून पाकिटात बंद करून मजजवळ दिलं त्या दोघी कॉलेजातल्या मैत्रिणी नंतर मी स्टेशनवर उतरून रेसिडेन्सीत गेलो तेव्हा शरयू नव्हती तेव्हा पाकिटाच्या कोपऱ्यात माझं नाव घातलं अन् दोन्ही गोष्टी भय्याजवळ दिल्या म्हटलं पत्र उघडल्यावर समजेल तिला सर्व तुला सर्व सांगायचं होतं पण वेळ कुठं होता ? त्या दिवशी मी कामातच होतो अन् काल तू बाहेर गेली होतीस पण तुझ्या इतून जर पाकिटावरची दोन्ही अक्षरं जरा काळजीपूर्वक वाचली असती तर हा गैरसमज झाला नसता पुरुषाच्या अन् बायकाच्या अक्षरात फरक असतो पत्ता तिनं लिहिला होता '

'पण ती कुठं वकील आहे इतकं बारकाईनं पाहयला !' नलिनी हसत म्हणाली

'आता आहे का काही तुझं म्हणणं ?'

'हो' नलिनी.

'अजून ?' सुरेश

'हं ! चहा घेऊन गेलं पाहिजे आता'

'वा ! एक सोडून दोन कप घेऊ परवाचा एक कप राहयला ना ! आम्ही वकील लोक अशिलाकडून फी वसूल करायला कसूर नाही करायचे'

नलिनी हसत हसत चहा करायला आत गेली

—*अग्रणी*

## पेन्शनर ◆ ◆ ◆ ४

महाराष्ट्राचे केंद्र पुणे, मुंबई की नागपूर हा वाद मागे पडून बरीच वर्षे लोटली होती, आणि पुण्या-मुंबईचाच वाद व चढाओढ वाढत्या प्रमाणात चालू होती मुंबईची बरोबरी पुणे निदान एका बाबतीत तरी थोड्या सरस रीतीनेच करीत होते. मुंबईत निरनिराळ्या मालाला मोठी बाजारपेठ होती तर पुण्याला लग्नाचा बाजार होता 'सीझन' ला ज्याप्रमाणे जो तो माल येऊ लागतो त्याप्रमाणे लग्नाचा सीझन आला की उपवर मुलींचे पालक आपल्या कुटुंबासहित पुण्याला येऊन राहात रेल्वे भलत्याच वेळी 'झोन' तिकीट काढते त्याऐवजी नेमक्या लग्नाच्या दिवसातच ते काढावे अशी विनंति करण्याकरता पेन्शनराचे एक शिष्टमंडळ जाणार होते व त्याची नावेही 'विश्राम' दैनिकात प्रसिद्ध झाली होती महाबळेश्वर किंवा माथेरानला जशी हवा खाणाऱ्याची हॉटेले असतात, तशीच पुण्याला 'जोडीदार गृह', 'शुभमंगल शांतिगृह' इत्यादि खास उपवर मुलींच्या पालकांना उतरण्याकरता हॉटेले उघडली होती

पुण्याचे शैक्षणिक महत्त्व जाऊन त्याला उघड उघड लग्नाच्या बाजाराचे स्वरूप आले होते कोणत्याही आळीतून एकदोन कुक एजन्सी, वाढपी पाहिजेत, कार्याकरिता वाजत्री, बँड मिळेल, इत्यादींच्या पाट्या खाजगी क्लासेसच्या पाट्याशेजारी विराजमान झालेल्या दिसत त्याचे कारण कदाचित् असेही असेल की, हल्ली बेकारीच्या दिवसात शिकून मोकळे हिंडण्यापेक्षा ताबडतोब एकादी एजन्सी गाठायला हरकत नाही एका ठिकाणी 'वर्ल्ड-वाईड कुक एजन्सी' तर दुसऱ्या ठिकाणी 'इंटरनॅशनल वाढपी एजन्सी'

तर तिसऱ्या ठिकाणी 'नॅशनल वाजत्री' अशा पाट्या सहज दिसून येत. एकाच कुटुबातल्या तीन भावापैकी एकाने क्लास, दुसऱ्याने कुक एजन्सी व तिसऱ्याने वाढपी पाहिजेत असे धदे काढून एकाच पाटीवर हे रगवले होते, त्यामुळे पालकाचीही सोय झाली मुलाचे डोके अभ्यासात चालले नाही तर लगेच दुसऱ्या क्लासात घालून त्याला त्याच्या पोटापाण्याची सोय सहज लावून देता येत असे

लकडीपुलाच्या पलीकडे आणि इतरत्र पसरलेले बगले पाहून काही लोक हे 'पेन्शनर पुणे' व हे 'तरुण पुणे' असा उल्लेख करीत [ जशी सदाशिवपेठी सस्कृति, वगैरे ]

नाशिकला किंवा पढरपूरला रेल्वे स्टेशनवर जसे बडवे येतात तसे पुणे स्टेशनवर पेन्शनराची गर्दी होई त्यामुळे अगदी महत्त्वाच्या कामाशिवाय तरुण लोक तेथे उतरावयाचे धाडस करीत नसत किवा महात्मा गाधीप्रमाणे आधीच्याच एकाद्या स्टेशनवर उतरत

❋ ❋ ❋

आमच्या आबा जानोरकरानी पेन्शन घेतल्याला दोन वर्षे झाली होती व इतर पेन्शनराप्रमाणे ते पुण्यास स्थायिक झाले होते त्याच्याकडे पाहताच या गृहस्थाला किती पेन्शन असावे याचा अदाज करणे फारच कठिण गेले असते कारण, त्याची राहणी एकाद्या तीस रुपये पेन्शन मिळविणाऱ्यासारखी असली तरी मायबाप सरकारला त्याच्याकरता महिना तीनशे रुपये द्यावे लागत नोकरीवर असताना ठेवलेली मोटार लोकाच्या डोळ्यावर येईल म्हणून ती विकून त्यानी एक छकडा ठेवला होता त्यामुळे अनायासेच खर्च कमी होऊन ग्रामोद्धाराला मदत केल्याचे श्रेय मिळविता येत होते

त्याच्या आठवड्याच्या पोषाखाचे काळजीपूर्वक निरीक्षण करणाराला पुण्यात चाललेल्या सर्व वादाचे तत्काळ ज्ञान झाले असते एक दिवस ते इग्रजी पद्धतीप्रमाणे पोषाख करीत, तर कधी खाली मोजे, बूट, धोतर व वर पगडी ठेवीत कधी अमेरिकन पद्धतीचा डबल-ब्रेस्टचा कोट व वर फेल्ट हॅट

तर कधी नुसताच रुमाल, कधी गांधी टोपी, व नेहरू शर्ट तर कधी खाकी कोट व वर काळी टोपी एकादे वेळी बोडक्याने हिंडून 'भाई' बनण्याचाही त्याना मोह होई शिवाय हल्लीचे युग cosmpolıtan, international वगैरे जाडे शब्द वापरून वागण्याचे असल्याने त्यानी एक निराळी टोपी स्वत बनविली होती त्या टोपीला ५–६ रगाचे तुकडे जोडले होते एका बाजूला पगडीचा जर, मधेच पाढरा, काळा, हिरवा, ताबडा, भगवा अशा विविध रगाची ती टोपी होती, व सरकारने तसली टोपी घालण्याची सक्ति निदान पेन्शनराना तरी करावी म्हणून मोठमोठ्या कॉंग्रेस पुढाऱ्याकडे जाऊन ती टोपी दाखविण्याचा त्याचा विचार होता, आणि जमल्यास कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळेला तसल्या टोप्याचा स्टॉल उघडण्याचा त्याचा मानस होता.

अलीकडे ते एकटेच गावाच्या बाहेरच्या एका पुलावर जाऊन बसत. तिकडे फार थोडी माणसे फिरावयाला येत त्याच्याच समोरच्या पुलाच्या कट्ट्यावर एक तरुण मुलगी सायकलवर येऊन बसे ते सारखे तिच्याकडे निरखून पाहात, कधी हसल्यासारखे करीत या म्हाताऱ्याला चळ तर लागला नाही ? असाही तिला सशय आला. का ते सुरेवाले असतात त्याच्या टोळीतला तर नसेल ? अशी तिला भीति वाटली

एके दिवशी आबानी तिच्याशी बोलायला सुरुवात केली

'नाव काय बाळ तुझ ?'

'नलिनी' तिन तिरसटपणे उत्तर दिले

'छान ..शाळेत जातेस की कॉलेजात ?'

'शाळेत सहावीत आहे'

'छान तुझे खूप फोटो काढले असतील नाही—एकादा देशील का मला ? ती ताडकन् उठून चालू लागली दुसऱ्या दिवशी आबा तिच्याशी बोलणार इतक्यात दोन तरुण काठ्या घेऊन सायकलवरून तेथे आले.

'काय हो आता या वयात असले ढग करता वाटत ? लाज नाही वाटत माझ्या बहिणीला असला प्रश्न विचारायला ? चागले सभ्य आहात की ! दात पाडले असते तर बोळक झालय् तोडाच बोला माफी मागता की पोलिसला सागू ?'

'माफ करा, पण आपण माझ्या घरी आलात तर खुलासा करतो सगळा '

ते सर्व त्याच्या घरी गेले

'थाबा ह, चहा सागून येतो समोरून '

मडळी खोलीत बसली खोलीत एका पाचसहा वर्षांच्या मुलीचे निरनिराळ्या वेषातील फोटो लावले होते

इतक्यात पोऱ्याने चहा आणला

'का आपल्या घरात कुणी मडळी नाहीत वाटत ? ' त्यापैकी एकाने विचारले

'ह...' म्हाताऱ्याने श्वास सोडला—

'एका मुलाशिवाय कोणी नाही मला,' ते सागू लागले 'अन् त्याच माझ पटत नाही निराळा राहतो तो कुटुब वारल्याला बरीच वर्षे झाली ही एक मुलगी होती, नलिनी तिच नाव तीही गेली आज असती तर तुमच्या या बहिणीसारखी दिसती हिला पाहिल त्याच दिवशी माझ्या हृदयात कसस झाल वाटल तीच पुनर्जन्म घेऊन आलीय् म्हणून हिचा फोटो मागितला या फोटोकडे तासन् तास पाहतो तेच एक सुख, तोच एक आनद आहे जगात मला माफ करा ह मडळी पण मी तसा प्रश्न विचारण गैर होत, भावनेचा अतिरेक होता तो...' म्हाताऱ्याने डोळे पुसले.

—ध्रुव

## सांसर्गिक रोग ◆ ◆ ◆ ५

रविवार होता त्या दिवशी मी नुकताच जेवून आरामखुर्चीवर वाचीत पडलो होतो इतक्यात बाहेर कसला तरी गोगाट ऐकू आला मी बाहेर आलो

एक भिकारीण घेरी येऊन पडल्याचे समजले मी गर्दीतून वाट काढीत पुढे गेलो

आमच्या आळीला रोज येई ती भिकारीण आमच्या आळीत ठरलेल्या दोन तीन घरी तिला नक्की काही तरी मिळे

❋ ❋ ❋

बरेच दिवस गेले मी त्या भिकारणीची गोष्टही विसरून गेलो होतो.

आमच्या शेजारच्या गोडबोल्याच्या रखमाबाई आईकडे आल्या होत्या. त्याचे काही तरी बराच वेळ बोलणे चालले होते

सहज माझ्या कानावर रखमाबाईंची दोन तीन वाक्ये आली—

'काय कराव या दुखण्यापुढ—हात टेकले बघा. दुसर बाळतपण झालं अन् ती अशी खगत चालली कधी चागल सुग्रास अन्न सुद्धा गोड लागत नाही. रोज पानातल भिकारणीला वाढाव लागत डॉक्टर म्हणतात फार अशक्त होती ती—त्यात गरोदर राहृयली, त्यानं अस झाल'

❋ ❋ ❋

रात्री जेवताना आई सागत होती, 'अरे ती गोडबोल्याची सगुणा

आजारी आहे म्हणे कायसासा इग्रजी रोग झालाय् तिला. काय बर त्या रखमाबाई सागत होत्या ह, टी बी. का कायसस म्हणतात त्याला '

मी नुसता हुकार देत होतो

आधीच सगुणा अशक्त त्यात हे जबरदस्तीन लादलेल मातृपद ! ती तरी काय करणार

❋ ❋ ❋

एके दिवशी आईने सागितले, 'ती गोडबोल्याची सगुणा गेली '

'अ. . ! ' मी आश्चर्यान विचारल

'खरच मघाच नेली तिला ' आई म्हणाली

❋ ❋ ❋

नुकताच मी सिनेमाहून परत येत होतो

एक बाई नवऱ्याचे उष्टे पाणी पिते व त्यामुळे तिला नवऱ्याला झालेला रोग होतो असे त्यात दाखवले होते.

मला काही केल्या तो मुद्दा पटत नव्हता.

विचाराच्या तद्रीतच मी घरी आलो.

❋ ❋ ❋

एक दिवस मागची ती भिकारीण पुन दाराशी आली तिच्या डोक्यावरच्या पाटीत एक लहान मूल होते पण आता ती पूर्वीसारखी धडधाकट दिसत नव्हती तिचे पाय लटलट कापत होते हातापायाच्या काड्या झाल्या होत्या डोळे खोल गेले होते

क्षयाच्या भावना दिसत होत्या

❋ ❋ ❋

गोडबोल्याच्या दारापाशी खूप गर्दी झाली होती

भिकारीण मरून पडल्याचे कोणी तरी बोलत होते

❋ ❋ ❋

'आमच्याच दाराशी मरायला येतात मेल्या' गोडबोल्याच्या रखमाकाकू बोलत होत्या 'सूनबाई असताना रोज तिच राहिलेल अन्न मी इला घालायची हो गेली बिचारी सगुणा--अन् ही देखील गेली'

❉ ❉ ❉

आणि ते ऐकून मला तो सिनेमातला मुद्दा ताबडतोब पटला. एक-मेकाचे उष्टे खाऊन खाऊन रोग होणे शक्य आहे पण एक प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला

सर्वच भिकाऱ्याना मूळचे रोग असतील का ?

का अशा सासर्गिक रीतीनेही पुष्कळ रोगी झाले असतील ?

मग हा दोष कोणाचा ?

भिकाऱ्याचा की समाजाचा ?

—यशवंत.

# मला पुढच्या वर्षी घेणार ना? ◊ ६

गणपति बसायला अजून पधरा दिवस अवकाश होता मेळेवाल्याची कोण गडबड उडाली होती प्रत्येकाला वाटे आपल्या मेळयाची जिकडे तिकडे वाहवा व्हावी आपला मेळा सर्वोत्कृष्ट ठरावा!

प्रत्येक मेळयाच्या तालमी चालल्या होत्या माझी एका मेळयाच्या चालकाशी ओळख होती, म्हणून मीही कधी कधी तालमीला जात असे

असाच त्या दिवशीही गेलो होतो रविवार होता त्या दिवशी आणखी पुष्कळ लोक पाहायला आले होते सर्वांना खोलीत बसणे शक्य नव्हते, म्हणून आम्ही बाहेर बाकावर बसलो

पदे सुरू झाली

इतक्यात एक सातआठ वर्षांचा मुलगा बाहेरून आला, व तो दारात येऊन उभा राहिला इतर मुलाच्या बरोबर तोही ते गाणे तोडात पुटपुटू लागला

मेळयाच्या चालकाचे लक्ष त्याच्याकडे गेले त्यानी त्याला दारातून बाजूला केले

हिरमुसला बिचारा त्याच्या डोळयातून अश्रू आले मी त्याला जवळ बोलावल 'तुझ नाव काय बाळ?' मी विचारल

त्यान सर्व हकीकत सागितली. 'मला मेळयात जायच. पण थोरला भाऊ जाऊ देत नाही'

'अहो मला पुढच्या वर्षी मेळयात घेणार ना?' त्यान चालकाना विचारल

'हो घेऊ ह.. !' चालक म्हणाले

❈ ❈ ❈

पुन पुढच्या वर्षी मी तो मेळा पाहायला गेलो, पण तो मुलगा कुठच दिसला नाही

मी चालकाच्या जवळ चौकशी केली

'तो रामू होय ?—अहो त्याचा थोरला भाऊ वारला....आता वर्तमानपत्र विकतो तो फक्त आईच आहे आता अन् रात्रीच्या शाळेत जातो'

माझ्या मन श्चक्षूपुढे रामूची बालमूर्ति उभी राहिली त्याला आता कधीच का मेळ्यात जाता येणार नाही ?

का त्याची स्वप्न अशीच विरणार !

—संजीवनी.

## फाटका शर्ट ◆ ◆ ◆ ७

नोव्हेंबर महिना सपत आला होता कडाक्याची थडी पडू लागली होती. रोज पहाटे शेकडो लोक गरम कपड्यानी अग लपेटून पर्वती, फर्ग्युसन कॉलेजची टेकडी, वगैरे ठिकाणी व्यायाम घेण्यास जात होते

कारण थडीच्या दोन तीन महिन्यात घेतलेल्या व्यायामाने एक वर्ष उत्साह कायम टिकतो असे अनुभवी लोक सागत असत

शिप्याची आणि कापडवाल्याची चैन झाली होती शेकडो लोक गरम कापडाचे कपडे शिवायला टाकीत होते चाभारानी मुद्दाम आपल्या दुकानात 'टेनिस शू'चा नवीन स्टॉक भरला होता

❋ ❋ ❋

'दादा एकादा फाटका कपडा असला तर द्या हो' एक म्हातारी भिकारीण दाराशी ओरडत होती

'ए.. अग चल जा माझ्याजवळ तुला देण्यासारख काही नाही, उगीच कटकट करू नकोस.' मी खेकसलो

'दादा, एकादा फाटका तुटका सदरा असला तर द्या हो! मुलगा आवळा आहे थडीन कुडकुडतो आहे हो—रावसाब!'

मी माझ्याजवळ असलेला एक जुना फाटका शर्ट तिला दिला ती निघून गेली

❋ ❋ ❋

माझ्या एका मित्राला जुन्या बाजारात काही तरी खरेदी करावयाचे होते तो व मी एका रविवारी सध्याकाळी जुन्या बाजारात गेलो

मला आश्चर्य वाटले माझ्या दाराशी आलेली ती म्हातारी भिकारीण एक दोन जुने कोट, सदरे, विजारी घेऊन विकावयाला बसली होती

मला तिचा सशय आला हिने चोरून तर नसतील ना आणले हे कपडे ? माझा शर्टही त्यात होताच

ही अशीच कपडे मागायच्या निमित्तान येत असेल आणि कुणी बघत नाही अस पाहून पळवले असतील हे कपडे !

माझ्या मनात शका आली

'काय ग, तू हा शर्ट तुझ्या आधळ्या मुलाकरता मागून नेलास ना ? मग इथ हे विकतेस का ? असा ढोंगीपणा करतेस का ! पोलीसच्या ताब्यात देऊ का ? '

'दादा काय करायच ? पोटाला धड मिळत नाही, म्हणून असं कराव लागत असेच तुम्हासारख्याकडून फाटके तुटके कपडे आणते अन् शिवून विकते मग काय करायच दादा—रोज तरी पोटाला कोण वाढत ?'

'मग काम करायला काय धाड भरलीय् तुला ? अन् तुझा मुलगा कुठय् ? ' मी गुर्मीत विचारले

'तो बघा पल्याड भीक मागतोय् अन् कसल काम करणार मी दादा ? कोण काम देतय् मला ! मी म्हातारी झाले मी तुम्हाला आजी शोभेन आता कसल काम होणार माझ्या हातन ? पोर आधळ त्यान तरी काय कराव. मला म्हातारीलाच त्याला मदत करावी लागते हात धरून प्रत्येक ठिकाणी न्याव लागत '

'मग खोट बोलून शर्ट कशाला आणलास ? ढोंगीपणा कसा येतो तेवढा ! काम करायला काय धाड भरलीय् तुझ्या मुलाला ! इग्लडमध्यें, अमेरिकेमध्ये, रशियामध्ये भीक मागायची बदी आहे समजलीस प्रत्येकानं काम केल पाहिजे फुकट ऐतखाऊपणा शिरलाय् तुमच्यात ! ! '

मी तावातावाने तिच्यापुढे व्याख्यान देत होतो तिला काहीच बोध झाला नाही माझ्या शब्दाचा

'कसल काम देता मला अन् माझ्या पोराला दादा ? काम करायला तयार आहे मी '

मी आश्चर्यचकित झालो तिचे उत्तर ऐकून

'खरच कसल काम द्यायच हिला ? ही काय काम करणार ? आणि हिच्या आधळ्या पोराला तरी करण्यासारख माझ्याकडे काय काम आहे ? ' मी गप्प बसलो

'दादा, आम्हा गरीबाना तुमचे हे कपडे वापरून काय करायच आहे ? इतके धड कपडे आम्हाला काय करायचेत ? आम्हाला लक्तरच पाहिजेत तरच कोणी तरी पै पैसा देईल आम्हाला पोटाची जरूर आहे दादा, पोटाला घाला मग थडी काय थडीचा बासुद्धा काही करायचा नाही आम्हाला तुमचे लोक लई बडबडतात, व्याख्यान देतात आमच्या वस्तीत येऊन आमची घर साफ करतात, पण त्येचा काय उपयोग आहे ? देवळात जाऊन का कुठ पोटाची आग थाबते ? '

'दादा काम वाटेल तितक करून घ्या चागल पोटभर पोटाला द्या कामाला नाही रडत आम्ही पण काम द्या नाही तर पोटाला घाला '

तिचे उत्तर ऐकून मी गार झालो

मुकाटयाने मित्र खरेदी करीत होता तिकडे मी गेलो

—यशवंत.

# अचानक भेट ◆ ◆ ◆ ८

माझी मुबईला जाण्याची ती पहिलीच वेळ होती

मुबईला हिदुमुसलमानाचा दगा सुरू झालेला दररोज नव्या नव्या बातम्या कानावर येत

आज काय तर 'पोलिसाना पाच वेळा गोळिबार करावा लागला.' उद्या 'लष्कर बोलाविले' परवा 'पन्नास इसम ठार झाले' या बातम्या वाचून आणि प्रत्यक्ष मुबईला जाऊन आलेल्या काही लोकाच्या 'प्रत्यक्ष पाहिलेल्या (?)' हकीकती ऐकून माझी तर पाचावर धारणच बसली होती पण आमचा आबा म्हणजे पक्का मुबईकर त्याने आत्तापर्यंत तीन दगे पाहिलेले तेव्हा तो फार मुरला होता मुबईत. हल्ला कसा चुकवावा, मुसलमानाच्या वस्तीतून कसे हिडावे हे त्याला पक्के ठाऊक त्याच्या सर्व पराक्रमाचा इतिहास लिहावयाचा म्हटला तर दुसरा एक 'दाजी' एवढा ग्रथ लिहावा लागेल

त्याने मला चार पाच दिवस मुबईला बोलावले आमच्या मातोश्रीना ते काही पसत पडले नाही त्याचे म्हणणे या दग्यात कशाला ? मग केव्हा तरी जाता येईल

पण मग केव्हा तरी—म्हणजे बहुधा पुढचा जन्म—(पुनर्जन्मावर विश्वास असला तर) घ्यावा लागावयाचा. कारण आत्तापर्यंत आमच्या मातोश्रीनी 'पुढ केव्हा तरी जाता येईल' या सबबीवर मला कुठेच बाहेर जाऊ दिले नव्हते मलाही पहिल्या पहिल्यादा वाटावयाचे, की आपल्याला इतक आयुष्य आहे मग पुढ जाऊ आत्ताच कशाला या विद्यार्थिदशेत-

पण पुढे शिक्षण सपून नोकरी लागल्यावर जसजशी ससाराची जबाबदारी अगावर पडू लागली तसतशी फुरसत अगदीच कमी मिळू लागली शिवाय घरातल्या काळज्या त्यामुळे विद्यार्थिदशेतले आपले आयुष्य आपण अगदीं फुकट घालवले असे वाटू लागले आणि दिवसेदिवस एकाद्या गोष्टीबद्दल कुतूहल आणि उत्साहही कमी होऊ लागला आणि इग्रजीतल्या म्हणीप्रमाणे 'Tomorrow has no end' असा दूरवर विचार करून मी मुबईला येण्याचे आबाला कबूल केले

तेव्हा आमची 'सौ'ही पाठीस लागली मी तिची नाना प्रकारानी समजूत घातली, की 'आता दगा आहे मग तुला केव्हा तरी नेऊ' पण छे! ती कुठली ऐकायला तिने आपली बाजू पुढे माडली

'रामाबरोबर सीता वनवासात सुद्धा गेली मग मी आपल्याबरोबर मुबईला आले तर काय झाल? देवाच्या मनात असल तर दोघाचाही मोक्ष होईल, नाही तर सातासमुद्रात बुडाल तरी मरण यायच नाही अगदी आगगाडी अगावरून गेली तरी काही व्हायच नाही.'

'अग पण सीता वनवासाला गेली तेव्हा तिला आपल्यासारखी चिगी नव्हती झाली' मी थट्टेन म्हणालो

यावर आमच्या मातोश्री एकदम रागावल्या 'हो, हो, मुल काही टाकून का द्यायचीत? सोन्यासारखी देवाच्या कृपेन मुल होतात ती तुम्हा अलीकडच्या पोराना नकोशी झालीत मुल म्हणे ससारसुखाच्या आड येतात कथेकरीबुवा परवाच सागत होते, की रशिया का कायसा देश आहे तिथ म्हणे पाजरपोळासारख्या मुल सभाळायच्या सस्था निघाल्यात काय तरी बाई . एकेक ऐकाव ते नवलच! कलियुग बर हे! पृथ्वीच्या डोक्यावर पापाचा भार फार झाला म्हणूनच असे दगे होतात'

शेवटी माझ्यात व 'सौ'त तडजोड झाली व आईची कशीबशी समजून घातली चिगीला आईजवळ ठेवून मी व 'सौ' ने मुबईस जावे असे ठरले

आम्ही मुबईस पोहोचलो आबा स्टेशनवर आला होता एक दोन दिवसात राणीचा बाग, आपोलो बदर, रीगल सिनेमा वगैरे ठिकाणे आम्ही आबाला बरोबर घेऊन पाहिली एक दिवस सकाळी सुमारे नऊ वाजण्याचे वेळेस एका ट्रॅम नाक्यावर ट्रॅमची वाट बघत आम्ही उभे होतो जरा वेळाने ट्रॅम आली पण ही गर्दी! मी आणि आबा कसे तरी गर्दीत वर चढलो पण सौ मागच राहिली तितक्यात ट्रॅम सुटली मग काय विचारता? माझा जीव तळमळू लागला आबान मला शिव्या द्यायला सुरुवात केली 'असा कसा रे तू? या मुबईत हल्ली मवाली फार त्रास देतात बायकोची तुला काळजीच नाही' इत्यादि

पण मला तिची किती काळजी वाटत होती हे जर त्याला दाखवण्याचे मजजवळ काही साधन असते तर हा सगळा दोषारोप त्याने माझ्यावर केला नसता अर्थात् मी गप्प बसलो पुढे ट्रॅम थाबली तेव्हा आम्ही झटकन् उतरून जवळ जवळ पळतच मागे निघालो दुसरी ट्रॅम येण्याची वाट पाहायला सुद्धा आम्हाला वेळ नव्हता आणि टॅक्सी किवा व्हिक्टोरिया करण्याचे विचाराच्या गोधळात आमच्या ध्यानातच आले नाही आमच्याकडे बघून लोक हसत होते पण आम्ही तिकडे लक्षच दिले नाही पण इतकी धादल करून जागेवर येऊन पाहतो तो काय! सौ कुठ आहे? माझ्या डोळ्यापुढे मुसलमान गुड उभे राहचले त्याच्या हातात चमकणारे ते सुरे! त्यानी तिला भोसकली असली तर!—आणि मग जे जे हॉस्पिटल वगैरे हॉस्पिटलाची, वर्तमानपत्रात वाचलेली, नामावळी डोळ्यापुढून जाऊ लागली

आम्ही खूप शोध केला पण पत्ता नाही! पुन ट्रॅममधून खूप हिडलो. हॉस्पिटलमध्ये फोन करून एकादी 'अशा अशा रगाची, उचीची, वर्णनाची बाई जखमी होऊन दाखल झाली आहे का म्हणून विचारले.' पण छे! कुठेच पत्ता लागेना! रात्री दहा वाजेपर्यंत भटकलो अन्न नाही, पाणी नाही, चहा नाही, पोटात कावळे ओरडू लागले.

रात्री दहाला कर्फ्यू ऑर्डर सुरू झाली आम्ही भटकत असताना, आम्हाला शिपायानी पकडून नेले आणि काय आश्चर्य ! —माझी सौ. ही तिथेच ! 'ऑ ' मी आश्चर्याने थक्क होऊन ओरडलो !

मला पाहून ती रडायला लागली 'बर झाल सापडलात म्हणून. मला वाटल—कशाला अभद्र बोलू ' मी तिची समजूत घातली

तिने मग सर्व हकीकत सांगितली, 'तुमची ट्रॅम गेल्यावर मी तुम्हाला शोधण्याकरता लागलीच मागून आलेल्या दुसऱ्या ट्रॅममध्ये बसले पण ती दुसरीकडेच गेली माझ्यापाशी एक आणा होता तो ट्रॅमला दिला पण पुढे एकही पैसा नाही मग खूप भटकले आणि रात्री दहा वाजल्यामुळे शिपायानी मला इथ पकडून आणल पाहिलत देवाची कृपा असली म्हणजे अशी भेट होते '

तिचा देवावरचा अढळ विश्वास पाहून मला तशाही स्थितीत हसू आल्याशिवाय राहिले नाही

❋ ❋ ❋

रात्र सपून उजाडल आणि मग आमची 'राम-सीतेची' जोडी पोलिस-कस्टडीतून सुटली

—मन्वन्तर

# पति कीं पातिव्रत्य ? ◆ ◆ १

सकाळी सात वाजण्याचा सुमार होता—मजुराचे तांडे गिरणीच्या रोखाने चालले होते

दगडूही भाकरी घेऊन चालला होता

❈ ❈ ❈

आज दोन दिवस दगडूला बारीक ताप येत असे

पण तसाच तो कामाला जाई

पण आज मात्र त्याच्याच्याने जाववेना !

❈ ❈ ❈

आठ दिवस होऊन गेले तरी ताप हटण्याची चिन्हे दिसेनात—

घरात अफू खाईन म्हटले, तरी सुद्धा एक पैसा नव्हता

त्याच्या मनात विचार आला, 'आता कोठून उसने पैसे आणावेत ? आपणा गरीबाला उसने पैसे कोण देणार ?'

त्याला एकदम आठवण झाली—

यशवत जॉबरची व त्याची बरीच दोस्ती होती दोघाचेही एकमेकाकडे बरेच जाणे येणे होते त्याने आपल्या बायकोला त्याच्याकडून दहा रुपये आणावयास पाठविले.

❈ ❈ ❈

बायको यशवताच्या घरी आली—

'काय ? कस काय ? इकड कुणीकड ?' तिला पाहून यशवत म्हणाला,

'माझ जरा काम आहे घरधणी आठ दिस जरा आजारी हायेत, तवा औषधपाण्याला पैसे हवेत' साळू म्हणाली

'अस्स ? किती पैसे पाहिजेत ?' तिच्याकडे रोखून पहात तो म्हणाला

आज बरेच दिवस त्याची साळूवर वाईट नजर होती आता अनायासेच आलेल्या सधीचा उपयोग करून घेण्याचे त्याने ठरविले

'या की, आत या अशा बाहेर कशाला उभ्या राहता ?'

ती आत गेली—

त्याने ट्रकेतून दहाची नोट काढली व तिच्यापुढे केली

तिने हात पुढे केला

त्याने चटकन् तिचा हात धरला

त्याच्या डोळ्यातल्या विषारी नजरेने साळूच्या हृदयाचे पाणी पाणी केले !

तिने त्याचा हात झिडकारला

ती दाराकडे गेली

तिच्या मनश्चक्षूपुढे एकदम पतीचे चित्र उभे राहिले.

'पति अथरुणाला खिळलेला आहे त्याच्या औषधाला आपल्याजवळ एक पैसाही नाही औषध मिळाले नाही मग.. ? शेवट... ??'

ती भानावर आली 'आता कस करायच ?'

दुसऱ्या बाजूला तिला मूर्तिमत पातिव्रत्य उभे असलेले दिसले

आपल्या पापाबद्दल परमेश्वर आपल्याला जाब विचारीत आहे असा तिला भास झाला

ती गोंधळली !

तिचा काहीच निश्चय होईना

तिच्यापुढे प्रश्न पडला, 'पति की पातिव्रत्य ?'

ती यशवताच्या घरातून बाहेर पडली त्या वेळी तिच्या हातात दहा दहाच्या दोन नोटा पडल्या होत्या

येताना ती डॉक्टरला घेऊन आली

डॉक्टरानी दगडूची प्रकृति तपासली व तो खास बरा होईल असे त्यानी साळूला आश्वासन दिले

❖ ❖ ❖

दगडू थोड्या दिवसानी पूर्ण बरा झाला, व आणखी काही दिवसानी कामावरही जाऊ लागला

साळू फिरून यशवतास भेटली नाही म्हणून त्याने मोठ्या प्रयत्नाने तिची भेट घेऊन आपल्या घरी तिला बोलावले ती सतापाने म्हणाली, 'मेल्या, एकदा अडचणीत गाठून सधि साधलीस, म्हणून फिरून मी तुला कबूल होईन, अस तुला वाटल होय ? खबरदार, आपल काळ तोड मला पुन दाखवशील तर !'

यशवत तिचे शब्द ऐकून आश्चर्यचकित झाला तो खुनशीपणाने हसून म्हणाला, 'अस्स ! अग सटवे ! काळ तोड तुझ का माझ हे तुला लौकरच दिसेल अन् मग कुठ जाशील ?'

❖ ❖ ❖

दुसऱ्या दिवशी दगडू सतापतच घरी आला त्याने साळूला खूप झोडपले व म्हटले, 'माझ्या आजारात असे धदे करायला लागलीस होय ? जीव घेईन तुझा ! ठाऊक नाही तुला ? चल चालती हो घराच्या बाहेर !!'

—यशवंत

## दुसरें लग्न ! ◆ ◆ ◆ १०

'काय यशवतराव आज इकडेशी वाट चुकली' मी विचारले

'वा. जस काही आम्ही कधी येतच नाही तुमच्या घरी '

'बर काही चहा वगैरे ' मी म्हणालो

'वा—चहाला कोण नाही म्हणतो वहिनीच्या हातचा चहा आम्हाला मिळालाच पाहिजे '

'अरे, पण आम्हाला केव्हा आणणार वहिनी ? आम्ही काय तुझ्याकडे आल्यावर हॉटेलचाच चहा घ्यावा वाटत ? ' मी विचारले

'किती वेळा सागितल तुला गोगटे, की लग्नाच नाव काढीत जाऊ नकोस म्हणून. येवढयासाठीच मी तुझ्याकडे फारसा येत नाही तुम्हा लोकाना बाकीचे उद्योग नसतात का ? ' यशवत चिडून म्हणाला

'बर बर, Excuse ह चहा सागतो—'

चहाच्या वेळेस इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या अन् तो जायला निघाला—

'अच्छा येतो मी ' 'ये असाच कधी तरी घरी गुड-बाय् '

यशवत माझा बालपणचा दोस्त एका गावात असून सुद्धा तो फारच क्वचित् माझ्या घरी येई मी मात्र त्याच्याकडे नेहमी जात असे क्वचितच स्वारी खोलीवर भेटत असे

माझ्याकडे तो आला की 'ही' त्याला दुसऱ्या लग्नाची गोष्ट हटकून काढायची. अन् मग तो भयकर सतापत असे एरवी अत्यत चांगल्या

रीतीने वागणारा मनुष्य एकदम दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढताच का चिडतो हे मला काहीच समजेना !

इतक्या तरुण वयात बायको वारली मुलेही कोणी मागे नाहीत, याचे वय फक्त अठ्ठावीस—इतक्या गोष्टी असताना वास्तविक त्याने लग्न करावयास पाहिजे होते नाही तर पुढे कोण विचारणार ?—अगात ताकद आहे तोपर्यंत आपण पुष्कळ गोष्टी रेटत असतो—पण तीच ताकद थोडी कमी झाली, थोडे आजारी पडलो—तर कोण विचारणार ?

याचे बायकोवर अत्यत प्रेम तर नसेल ना ?—एक प्रश्न माझ्या मनात आला पण प्रेम म्हणावे तर त्याच्या खोलीत तिचा एकही फोटो नव्हता तोही आपल्या बोलण्यात तिच्यासबधी अवाक्षरही काढीत नसे. मग हे गूढ तरी काय आहे ? माझी तर बुद्धि थक्क झाली होती

डॉक्टरी पेशाचा मनुष्य मी हजारो तऱ्हेचे रोगी माझ्या हाताखालून गेले होते कित्येकाची गूढ गुपिते मी हळू हळू त्याच्या मनातून काढली होती पण यशवत माझा इतका जानी दोस्त असून सुद्धा त्याच्या मनाचा थाग मला नव्हता

एक दिवस मला माझ्या दुसऱ्या एका स्नेह्याचे पत्र आले तो सात आठ दिवस सहज हवा पालटायला येणार होता मलाही आनद झाला. मी त्याला ताबडतोब ये म्हणून लिहिले

'काय ठीक आहे ना सर्व ?' त्याने विचारले

'हो उत्तम आपला तो येशा इथच असतो !'

'अस्स ?...काही लग्नबिग्न् केलन् का त्यान ?'

'छे रे ! अन् लग्नाच नाव काढल की असा चिडतो—'

'ह.. ट्रॅजेडी आहे बिचाऱ्याची !' माझा मित्र उच्छ्वास सोडून म्हणाला

'म्हणजे, मी नाही समजलो ! इतका पैसा आहे, तारुण्य, शिक्षण, शेकडो मुली सागून येतात त्याला. ट्रॅजेडी कसली ?'

'फार मोठी आहे ती गोष्ट गोगटे—सागेन केव्हा तरी. पण अगदी गुप्त राहिली पाहिजे ह ! आपल्या येशाची म्हणून नाही, पण अशा किती तरी गोष्टी आपल्या समाजात घडतात सागेन मग रात्री.'

रात्री जेवण झाल्यावर आम्ही गच्चीवर जाऊन बसलो त्यान हकीकत सागायला सुरुवात केली

'तुला माहीत आहेच त्याची आई तो वीस वर्षांचा असताना वारली. आईचा अत्यत लाडका पण त्याचा बाप म्हणजे नुसता कर्दनकाळ होता. जरा काही कमीजास्त झाल, की आईला अन् त्याला झोडपून काढी माणुसकी कशाशी खातात हे ठाऊकच नव्हत त्याला. पुढ दुसऱ्याच वर्षी लग्न केल त्याच्या बापान बापाच वय सत्तेचाळीस अन् तिच सतरा जोडा छान शोभायचा ! सगळ्या गावात तो एक उपहासाचा विषय होऊन राहिला होता त्याचा बाप घरी क्वचित्‌च असायचा सदा फिरती सावकारी करण्यात जन्म गेलेला पैसा म्हणजे प्राण मुलाच्या हातात एक पैसाही द्यायचा नाही काही लागल तरी स्वत आणून द्यायचा

'घरी फक्त हा अन् त्याची सावत्र आई स्वाभाविकच तिला म्हाताऱ्या नवऱ्यापेक्षा सावत्र मुलगा आवडू लागला त्यात तिचा तरी काय दोष ? जोपर्यंत आमच्या समाजात स्वत चीं मुल बरोबरीची झाली तरी स्वत च लग्न करण्यास बापाना लाज वाटत नाही अन् केवळ पैशाकडे पाहून मुलीचे वडीलही पोटच्या मुलीला विकायला मागपुढ पाहात नाहीत तिथ असे प्रकार घडले तर आश्चर्य वाटायच काय कारण आहे ? मग हा दोष त्याचा, की वडलाचा, की समाजाचा ?

'त्याच्या सावत्र आईने प्रेमाचे चाळे करायला सुरुवात केली पहिल्या प्रथम त्याला विशेष समजल नाही पण एक दिवस तो खोलीत झोपला असता ती आत आली तिन आतून दाराला कडी घातली तो जागा झाला. सगळा प्रकार त्याच्या ध्यानात आला. तो तिला खूप बोलला ती सतापली. तिन वडिलाच्या जवळ सर्व उलट हकीकत सागितली. वडिलानी त्याला झोडपून काढले.

'काही दिवसानी तो पदवीधर झाला त्याला नोकरी लागली. त्याचही लग्न झाल आता त्याच घर म्हणजे जवळ जवळ धर्मशाळाच झाली होती पूर्वी कधीही न बघितलेले लोक खुशाल घरी यऊन राहात त्याची सावत्र आई त्याच्याशी प्रेमान वागे त्याचे वडील बाहेरगावी त्यान त्याना

किती वेळा सागितल, की इथ रहा पण म्हातारा पैशाच्या पाठीमाग. याच्या बायकोला ती भयकर छळे सगळी काम तिला करावी लागत. त्याला सावत्र भाऊ झाला पण त्याचा चेहरा .. ..

'दोन महिन्यातच ते पोरग गेल स्वाभाविकच मृत्यु आला त्याला. कारण त्याच्या पोटात काहीच गेल नव्हत ! खर नाही वाटणार आमच्या लोकाना हे ज्या समाजात आईच्या प्रेमाचे पोवाडे गायची फॅशनच पडली आहे तिथ याच्यावर विश्वास तरी कोण ठेवणार ? पण तू डॉक्टर आहेस. तुला खर वाटेल बाळतपणाच्या वेळेस 'डॉक्टर मूल मेल तरी चालेल, पण मला वाचवा हो' म्हणून तुझी किती तरी स्त्रियानी विनवणी केली असेल जीव सबसे प्यारा आहे पण एकदा 'जननी जन्मभूमिश्च.. ' म्हणून बोलायचीच जिथ पद्धत पडली तिथ यावर विश्वास कोण ठेवतो अन् उघड दिसल तरी तोडान कस बोलायच ? तिला आई म्हणाव का राक्षशीण तेच समजत नाही मला.

'त्याचे वडील तर अगदी गोगलगाय बनले होते. याच्या बायकोला ती मुद्दाम तिच्या नवऱ्याची काम करायला सागायची. तिन त्याच्या मनात तिच्याविषयी काही तरी भरवून दिल होत त्या थेरड्याला तर म्हातारचळ लागला होता

'एकदा हा वडिलाच्या खोलीत गेला वडील त्याच्या बायकोशी लगट करीत होते ती बाहेर जायचा प्रयत्न करीत होती. तो भयकर सतापला त्यान खाडकन् वडिलाच्या श्रीमुखात दिली तो निराळा राहू लागला त्याच्या सावत्र आईचा डावच होता तो एक ! सुनेचा तिकडे सबध लावला कीं हिला सार रान मोकळ झाल

'तीन वर्षांपूर्वीच त्याचे वडील वारले तिला उलट बरच झाल, आयत स्वराज्य मिळाल दाही दिशा मोकळ्या झाल्या एका बाळतपणात याची बायको क्षयान गेली तेव्हापासन याच डोक फिरल एरवी फार सज्जन आहे. पण घरी असला, की कधी कधी ढसढसा रडतो त्याच्या बायकोचा लग्नाच्या वेळचा एक फोटो आहे त्याच्या ट्रकेत तो जवळ घेऊन

तासन् तास त्याच्याकडे पाहात बसतो तेव्हापासन लग्नाची दहशत घेतली आहेन् त्यान

'बरीच रात्र झाली वाटत ? चला झोपू आता ! '

आम्ही उठलो पण मला काही केल्या झोप येईना काय बिचाऱ्याची अवस्था झाली होती. असे प्रसग समाजात किती तरी घडत असतील ?

एक दिवस तो पेढयाचा पुडा घेऊन आला

'अरे गोगटे आनदाची बातमी—हे घे पेढे ? '

'काय हो कसली बातमी, लग्न ठरल की काय तुमच ? ' तिने आतून विचारले

'ही पहा तार ' त्याने माझ्यापुढे तार केली तारेत खालील मजकूर होता—

'तुमची आई वारली फार वाईट वाटते

—विष्णु '

'वहिनी, आजच माझी आई वारल्याची तार आलिय् तिच्या भावाकडून आता करू लग्न स्वस्थपणे ! '

ती आश्चर्याने त्याच्याकडे पाहात होती

मी मात्र भराभरा दोन तीन पेढे खाल्ले

—यशवत.

# विक्रमबहादूर ◆ ◆ ◆ ११

त्या वेळी रेकॉर्ड-ब्रेकची साथच जवळ जवळ पसरली होती असे म्हटल्यास फारसे बिघडणार नाही

तो रोग लोकामध्ये दररोज वाढत्या प्रमाणावरच दिसून येत होता दररोजच्या वर्तमानपत्रातील 'रेकॉर्ड ब्रेक' चे आकडे पाहून लोकाची छाती दडपून गेली होती

वृत्तपत्रानाही ऊहापोह करण्याला एक चागलाच विषय मिळाला होता काही वृत्तपत्रानी एका रेकॉर्डब्रेकरचे सविस्तर चरित्र दिले, तर काहीनी रेकॉर्ड, याला मराठी शब्द असावा असा अट्टाहास धरून, त्याला नेमका कोणता शब्द असावा याची उलट सुलट चर्चा चालवली एकूण काय तर त्या वेळी लोक या रोगाने अगदी ग्रासून गेले होते प्लेगच्या दिवसात जसे लोक म्युनिसिपालिटीकडे धाव घेतात, तसे ते आता वर्तमान-पत्राकडे धाव घेऊ लागले - एकाने सायकल-रेकॉर्ड मोडले, तर दुसरा चालण्याचे रेकॉर्ड मोडू लागला, तर तिसऱ्याने हजामतीचे रेकॉर्ड सुरू केले चौथा 'सतत दोन तास फिरत राहून शखध्वनि करण्याचे रेकॉर्ड करणार असल्याचे जाहीर झाले '

एक दिवशी आमच्या आबाच्याही मनात आले की, आपणही 'रेकॉर्ड' करावे, पण कसले रेकॉर्ड करणार ? कारण रेकॉर्ड करायला लोकानी एकही विषय शिल्लक ठेवला नव्हता

'आता नवीन कसल रेकॉर्ड कराव ? ' आबानी डोक खाजवल, आपल्या खरबरीत दाढीवरून हात फिरवला, सिगारेटने काळ्याकुट्ट झालेल्या

खालच्या ओठावर वरचे पिवळसर दात दाबले—झाले चटकन् त्याना कल्पना सुचली

'आपणही रेकॉर्ड करणार वसतराव, बस्स ठरल आपण रेकॉर्ड करणार' ते मला म्हणाले मी आश्चर्याने पाहू लागलो

'अस पाहू नका माझ्याकडे, आपण खरच रेकॉर्ड करणार' आबा पुनः म्हणाले

'अ .पण कसल रेकॉर्ड करणार तुम्ही?' मी विचारल

'अस्स अस्स विचारा...कुणी आत्तापर्यंत केल नाही असं रेकॉर्ड करणार'

'पण कसल ते तर सागाल की नाही?'

'सागतो हे बघा मी रागायच रेकॉर्ड करणार सतत पाच तास रागत राहयच दोन हात अन् दोन गुडघे यावर चालायच'

'काय, कशी कल्पना आहे?'

मी थोडा विचार केला व म्हटल, 'कल्पना उत्तम आहे, पण आबा तुम्हाला पाच तास रागता येईल का?'

'म्हणजे?' ते रागाने म्हणाले, 'तुम्हाला काय वाटल वसतराव? इतके दिवसात माझी योग्य पारख तुम्हाला झाली नाही?'

'असे नाही आबा' मी समजावण्याच्या स्वरात म्हणालो 'पण .

'पण काय?. बोला ना पण काय ते?' ते म्हणाले

'जरा स्पष्ट बोलतो, माफ करा पण तुमच पोट ते जमिनीला लागेल त्याची वाट काय?'

'पण छट् ते शक्य नाही आपण काळजी घेऊ'

आम्ही रेकॉर्डब्रेकचा निश्चय ठरवून तयारीला लागलो

पहिल्यादा मी एका गवळ्याकडे गेलो. त्याच्या गोठ्याच्या मागच्या बाजूला थोडीशी जागा मोकळी होती ती नीट सारवून स्वच्छ करवून घेतली.

मग तिथे भोवताली दोरीचे कपाउड घातले लोकाना कळावे म्हणून रेकॉर्डब्रेकची जाहिरात वर्तमानपत्रात दिली. ती खालीलप्रमाणे —

रेकॉर्ड ! रेकॉर्ड !! रेकॉर्ड !!! या व पहा ! अशी सुवर्ण सधि पुन मिळणार नाही

‘ठणठणपूर येथील सुप्रसिद्ध सनातनी पुढारी आबा आचरट गबाळे हे सकाळी सहा वाजल्यापासून दुपारी अकरा वाजेपर्यंत रागण्याचे रेकॉर्ड करतील तरी ही सधि लोकानी वाया दवडू नये व स्वत हजर राहून त्याना उत्तेजन द्यावे’

रेकॉर्डकरता खालील डॉक्टराची कमिटी नेमली होती —

(१) डॉ यशवत रामभाऊ फुकटे, (२) डॉ येरअप्पा शिक दीडमिशे, व (३) डॉ फु ची शौ

यातील पहिले गृहस्थ एका केमिस्टकडे दहा वर्षे बाटल्या विसळण्याचे काम करीत होते

दुसरे कानडीअप्पा, यानी आयुर्वेदिक विद्यालयात प्रवेश मिळविला होता

व तिसरे जपानी गृहस्थ, याच्याबद्दल विशेष माहिती नव्हती

ठरलेल्या दिवशी रेकॉर्डला सुरुवात झाली.

त्याच्या आधी आबानी गुडघ्याला चिंध्या गुडाळल्या व हातात खडावा घातल्या

रेकॉर्ड सुरू होऊन दीड तास झाला तरी लोक येईनात शेवटी तिसऱ्या तासानतर सुमारे १५–२० लोक येऊन गेले. सुमारे दहा वाजता आबाच्या पोटात दुखू लागले व डॉक्टराच्या सल्ल्यावरून त्यानी रेकॉर्ड थाबवले.

❋ ❋ ❋

दुपारी आबाच्या दारावर पुढील फलक लावला —आबानी सतत चार तास रागून रागण्याचे जागतिक रेकॉर्ड केले आहे ते नामाकित डॉक्टराच्या उपचाराखाली असून त्याच्या अगात ९८ ५ ताप आहे डॉक्टरानी त्याना हालचाल करण्यास बदी केली आहे. तरी बातमीदारानी व इतर इष्टमित्रानी त्याना आज भेटू नये उद्या त्याना थैली अर्पण करण्यात येईल

दुसरे दिवशीच्या वर्तमानपत्रात आबाच्या रेकॉर्डब्रेकची बातमी होती व रेकॉर्ड पाहण्याला ३००–४०० वर जनसमुदाय होता असे छापले होते. थैली-अर्पणसमारभाचे अध्यक्षस्थान आम्ही नगराध्यक्षाना दिले होते.

❈ ❈ ❈

शेवटी थैली-अर्पणसमारभ झाला त्यात माझे व आबाचे मिळून पधरा रुपये होते पण आम्ही देणगी देणाराची नावे दडपून दुसरी दिली होती व त्याचे पत्ते कलकत्ता, मद्रास, इत्यादि लाबच्या गावाचे दिले होते उद्देश हा की त्या ईर्षेने तरी आम्हाला आणखी पैसे मिळतील, पण आमची आशा व्यर्थ ठरली

पैशाची पिशवी मोठी दिसावी म्हणून आम्हीं त्यात मुद्दाम पैसे, आणे, रुपये वगैरे भरले होते, व रुपयाचा आकडा चापून पन्नास सागितला

शेवटी अध्यक्षाचे भाषण झाले, व हा समारभ सपला मी आमचे कोणतेही बिग बाहेर फुटले नाही म्हणून मनातल्या मनात देवाचे आभार मानले

❈ ❈ ❈

लहानपणी आबानी रडण्याचे रेकॉर्ड केले होते ( त्याच्या आईच्या, मामीच्या आठवणीवरून )

❈ ❈ ❈

आबा लौकरच रेकॉर्ड करण्याकरता परदेशी जाणार आहेत

—प्रभा

# प्रेमाची बेबंदशाही ◆ ◆ १२

प्रेम आणि त्याची बेबदशाही ? —किती परस्परविरोधी शब्द हे ! असे पुष्कळ अननुभवी तरुणाना आणि बालकवीना वाटण्याचा सभव आहे पण मित्रानो, माझे अनुभव तर ऐका, म्हणजे प्रेमबीम सर्व झूट आहे असे तुम्हाला आढळून येईल

पुष्कळ लोक निरनिराळ्या विषयाच्या पदव्या घेतात पण 'प्रेम' या विषयावर एकादा निबध लिहून Ph D झाल्याचे कोणाच्या तरी ऐकिवात आहे काय ? मी माझ्या स्वानुभवावरून तसा प्रयत्न करून डिग्री मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे, आणि या बाबतीत होतकरू विद्यार्थ्यांना साहाय्य देण्याकरिता एक स्कॉलरशिपही ठेवणार आहे

हा मार्ग सकृद्दर्शनी वाटतो तितका सोपा नाही, याच्या मार्गात अनेक अडचणी आहेत पण एकदा का याचे शेवटचे टोक गाठले, म्हणजे स्वर्ग सुद्धा याच्यापुढे कमीच ठरेल

शाळेत असल्यापासून या विषयाच्या अभ्यासाला मी सुरुवात केली. पुढे पुढे या मार्गातील यशाचे धागेदोरे माझ्या हाती लागले मग काय उशीर ? दिली आगगाडी भरधाव सोडून पण मला काय माहीत, की ही आगगाडी मुबईला थाबली नाही तर समुद्रात जाऊन पडेल म्हणून ! शेवटी मला समुद्रात जीव द्यावासा वाटला

एकाद्या मुलीवर आपले प्रेम असले म्हणजे ते ताबडतोब व्यक्त करावे, नाही तर आपली शरीरप्रकृति खराब होते असे मी कोठेसे वाचले होते म्हणून तसे करण्याचे मी ठरविले

एकदा सहज एका मुलीची आणि माझी ओळख झाली आणि तीही अशा प्रसगी, की मला वाटले इचे आपल्यावर खात्रीने प्रेम बसणार

एकाद्या तरुणीचा हातरुमाल किंवा डोक्यातले फूल खाली पडले, म्हणजे ते आपण उचलून द्यावे, म्हणजे ओळख होते असे मी पुष्कळ कादबऱ्यातून वाचले होते आणि नाटकातही तसे प्रकार पुष्कळदा पाहिले होते तेव्हा अशी एकादी सधि आपल्याला यावी म्हणून मी बरेच दिवस वाट पाहिली पण अशी एक सुद्धा अजागळ तरुणी मला आढळली नाही

तेव्हा मुद्दामच तसा एकादा प्रसग घडवून आणावा असे मी ठरविले

एकदा मी मडईंत गेलो होतो माझ्यापुढेच एक तरुणी बटाटे खरेदी करीत होती मला वाटले ही सधि बरी आहे आता आपण धक्का देऊन बटाटे साडावेत आणि पुन भरून द्यावे म्हणजे मग ओळखीला काय उशीर? 'बटाटे साडण ओळख .घरी येण जाण प्रेम .लग्न ?' बस्स

व्यापारी तराजूत बटाटे ओतणार इतक्यात मी धक्का दिला बटाटे साडले मी sorry म्हणून ते भरण्याचा प्रयत्न करू लागलो पण तो बटाटेवाला खरोखरच बटाट्या असावा त्याला बिचाऱ्याला काय माहीत, की तरुणीचे प्रेम सपादन करण्यास एकादे वेळी बटाट्याचा सुद्धा उपयोग होतो कारण, तसे त्याला माहीत असते, तर त्याने आत्तापर्यंत कित्येक तरुणीचे प्रेम सपादन केले असते कारण त्याच्याजवळ कमीत कमी दहा मण बटाटे होते त्याला वाटले आपल्या गिऱ्हाइकाचा माल याने साडला म्हणून त्याने माझ्या गालावरचे गुलाब (!) खुलवले मला वाटले आता ती तरुणी नागिणी-सारखी त्या व्यापाऱ्यावर तुटून पडेल, (नागीण कशी तुटून पडते ते मी अजून पाहिले नाही) म्हणून मी डोळ्यातून गगायमुना येण्याचा सारखा प्रयत्न करीत असताना सुद्धा निखारे फुलवले पण—सगळेच जिथे आपले कमनशीब तेथे हे तरी कसे होणार—त्या तरुणीने, बरी मेल्याची खोड मोडली अशा दृष्टीने माझ्याकडे नेत्रकटाक्ष (म्हणजे काय कोणास ठाऊक) टाकले ती गोगलगायीसारखी गरीब बनली (यात केलेली प्रणयाची वर्णने इतर करतात तशीच मी केली आहेत. माझा प्राणिशास्त्राचा अभ्यास नाही हे वाचकानी लक्षात ठेवावे) तेव्हा माझ्या डोळ्यात फुललेले निखारे

वाया गेले त्या तरुणीने एक शब्द बोलायचा अवकाश, की मी त्या व्यापाऱ्यावर अगदी तुटून पडायचा बेत केला होता (माझ्या त्या बेताला व्यापाऱ्याने बराचसा 'हातभार' लावला होता कारण मी तुटून म्हणजे फिट येऊन पडणारच होतो) दोन मिनिटे वाट पाहून सुद्धा ही काहीच बोलत नाही, असे पाहिल्यावर मी ताबडतोब तिच्या वाटेला जाण्याचे सोडून देऊन माझ्या वाटेला लागलो

रेसिसमध्ये जसे एकाद्या घोड्यावर लावलेले पैसे तो घोडा आला नाही म्हणजे फुकट गेले तर त्याची भरपाई दुसऱ्या घोड्यावर दुप्पट पैसे लावून करावी लागते, तद्वतच प्रेमाच्या बाबतीत एक चान्स फुकट गेला, तर लागलीच दुसरा बघावा लागतो

एकदा सायकलवरून कॉलेजमधून येत असताना माझ्यापुढे एक कॉलेजकुमारी पायचाकीवरून चालली होती आता माझ्या आणि हिच्या सायकलची जर टक्कर झाली, तर प्रेम अगदी ताबडतोब बसेल, असा विचार मनात येतो न येतो तोच, दुर्दैवाने—नव्हे सुदैवाने—त्या तरुणीच्या सायकलपुढे एक कुत्रे आडवे आले अन् त्यामुळे तिने लागलीच ब्रेक दाबले पण मी माझ्या विचारतद्रीत असल्यामुळे मला हे इतक्या थोड्या वेळात घडलेले काहीच दिसले नाही व माझी सायकल—मी नाही—धाडकन् तिच्या सायकलीवर आदळली माझ्या कबरेत बराच मार लागला होता, पण मी कबर कसून उठलो काय तिचे मुख आरक्त झालेले होते ! मला वाटले, ह्या ठिकाणी जर कालिदास उभा असता, तर त्याने या प्रसगावर एक नाटक लिहिले असते पण कालिदासाच्या काळी सायकली नसल्यामुळे, तिच्या टकराही होत नसाव्यात आणि त्यामुळेच दुष्यताला शकुतलेचे प्रेम सपादन करण्यास दुसऱ्या मार्गाचा अवलब करावा लागला नाही तर त्याने आपल्या व शकुतलेच्या सायकलची टक्कर करूनच तिचे प्रेम सपादन केले असते दुर्दैवी बिचारा !

मी म्हटले 'I am sorry, तुम्हाला लागल का ?'

ती उत्तरली, 'छे, Thank you !'

मी प्रश्न केला 'Do you want my handkerchief ?'

ती म्हणाली 'Shut up, I do'nt want anything!' मी निरुत्तर झालो एवढा वेळपर्यंत आमच्याभोवती बऱ्याच लोकाचा गराडा पडला होता काही लोक दतपक्ति (किडक्या, पिवळसर, इ० इ०) दर्शवीत होते काहीनी आपल्या अस्तन्या वर सारल्या होत्या मी कोटाची बाही खाली करून सायकलवरून चालता झालो दुसरा चान्स फुकट गेला

एकदा कॉलेजातून पायी घरी येत असताना बराच पाऊस आला माझ्या हातात छत्री होती मी उघडून चालू लागलो! पण आमच्याच वर्गातली एक तरुणी पावसातून जात होती मला ते पाहून फार वाईट वाटले उद्या हिचे पाणी मुरून डोके दुखले, तर विनाकारण डॉक्टरला पैसे द्यावे लागतील मी जवळ गेलो अन् म्हणालो, 'तुम्हाला छत्री पाहिजे का?'

ती म्हणाली, 'पण तुम्हाला पाऊस लागेल ना ?'

मी म्हणालो, 'मला पाऊस लागला, तरी चालेल, तुम्ही घ्या '

तिने छत्री घेतली मी पावसातून चालू लागलो कोट भिजला टोपी आतल्या खिशात ठेवली होती मला सोमदत्त वादळात सापडल्याची आठवण झाली त्या वेळी पाऊस आला असलाच पाहिजे असे माझी मनोदेवता—हृदयदेवता नव्हे—सागू लागली

त्या तरुणीचे घर आल्यावर ती म्हणाली,'Thank you for your kindness ही घ्या छत्री'

मी म्हणालो, 'छे छे, त्यात एवढ हे काय आहे!' ती Good-bye म्हणून आत निघून गेली

मी ऐटीने रस्त्यातून छत्री घेऊन चाललो लोक माझ्याकडे पाहून फिदीफिदी हसत होते मला त्याच्या हसण्याचे कारण काही केल्या कळेना मी माझ्या सर्वांगाकडे पाहिले, तरी उलगडा होईना शेवटी घरी आलो वडील दारातच उभे होते छत्री वाळण्याकरिता तशीच उघडी ठेवून दिली वडिलानी चमत्कारिक दृष्टीने माझ्याकडे पाहिले मी माडीवर कोट काढण्याकरिता जाऊ लागलो इतक्यात वडिलानी हाक मारली, 'गोपाळ इकडे ये!' मी आलो ते म्हणाले, तुझ्याजवळ छत्री असताना तुझा एवढा कोट अन् विजार कशी भिजली रे?' आता माझ्या डोक्यात चक्क प्रकाश पडला

मघाशी रस्त्यातले लोक माझ्याकडे पाहून का हसत होते ते आता माझ्या लक्षात आले माझ्याजवळ छत्री असताना सुद्धा माझ्या डोक्यातून पाणी वाहत होते सर्व कोट भिजला होता. याचेच त्या लोकाना बहुत करून हसू येत असावे मी क्षणभर गोंधळलो मान खाली घातली वडिलाना वाटले किती आपला मुलगा आज्ञाधारक आहे ! ते म्हणाले, 'अरे, इतक त्यात वाईट वाटून घेऊ नको जा, वर जा अन् कपडे बदलून कॉफी घे '

मला बरे वाटले नाही तर बाहेर विजाचा कडकडाट होऊन आकाश कोसळून पडतच होते आता घरातही तसा कडकडाट झाला असता म्हणजे मग आकाश कोसळायला किती उशीर ? मी घरात गेलो वडिलाची आज्ञा शिरसामान्य केली कारण त्याशिवाय गत्यतरच नव्हते

दुसरा दिवस उजाडला माझें त्या मुलीवर प्रेम बसले होते, तसे तिला स्पष्ट सागायचे मी ठरविले

कॉलेज सुरू झाले प्रोफेसर लेक्चर देऊ लागले पण माझे लक्ष सारखे तिच्या 'फेस'कडे होते कारण पावडर फक्त फेसलाच लावतात

तिच्याही मनात माझ्याविषयी प्रेम उत्पन्न झाले असेल का ? एका मनाने दुसऱ्या मनाला प्रश्न केला दुसरे मन बरेच आशावादी होते ते म्हणाले, अरे, हा प्रश्नच मुळी वेडेपणाचा आहे काल तुमची 'छत्रीतली मैत्री' नाही का झाली ! मग, आता विचार कसला करतोस ? टाक तिला एकदम सागून कॉलेज सुटल्यावर मी तिला भेटण्याचे ठरविले कॉलेज सपले ती बाहेर आली आम्ही बरोबर चालू लागलो ! आता कोणच्या भाषेत प्रेम व्यक्त करावे असा विचार मनात आला कारण प्रेम व्यक्त करायच्या अनेक भाषा असतात काहीना 'हृदयाची हाक' ऐकू येते, तर काहीना नेत्राच्या भाषा अवगत असतात, तर काही हाताच्या खुणा करतात पण मला यापैकी एकही भाषा येत नसल्यामुळे मी सध्या जगामध्ये राजमान्य असलेल्या इग्रजी भाषेचाच उपयोग करण्याचे ठरवले मराठी भाषेमध्यें शब्द फार अपुरे आहेत इग्रजी कसे धडाधड बोलता येते. ती खुमारी काही मराठीत नाही अहो साहेबाची भाषा साहेबानीच मडमेजवळ बोलावी

पण मी साहेब नव्हतो निदान गावातल्या चार टारगट पोरानी 'गावठी साहेब' म्हणण्याइतकी सुद्धा माझी योग्यता नव्हती पण म्हणून काय मोठ्या लोकाचे अनुकरण करू नये ? मी इग्रजीत बोलायचे ठरविले.

ती माझ्या बाजूला होती—म्हणजे आम्ही दोघे एकापाठोपाठ गटाराच्या एका कडेने चाललो होतो मी प्रत्येक पाऊल अगदी खबरदारीने टाकीत होतो हो, कारण यदाकदाचित् वाकडे पाऊल पडले असते, तर त्या गटारातल्या पाण्याचे शितोडे माझ्या अगावर उडाल्याशिवाय राहिले नसते त्यातून मी पाढरपेशा—माझे कपडे पाढरे—माझ्यावर सगळ्याचा डोळा, मग मी असे वाकडे पाऊल टाकून कसे चालेल ?

मी म्हणालो, 'अहो, तुमच्याशी मला जरा बोलायच आहे '

'काय पाहिजे तुम्हाला ? ' ती म्हणाली

मी अगदी बोलण्याच्या ओघात होतो की तुमच हृदय मला पाहिजे ! पण जर तिने मला हृदय दिले, तर ती कशी जिवत राहणार ? मग तिचे अस्तित्व कायमचे नाहीसे होणार म्हणून मन आवरले

मी म्हणालो, 'तुमची वही मला मिळेल का ?' तिने मला वही दिली दोन दिवसानी मी ती परत दिली मला वाटले, की हिचे आपल्यावर खात्रीने प्रेम बसणार. एक दिवस मी म्हणालो, 'I love you !'

तिने माझ्याकडे रागाने पाहिले 'Shut up that nonsense !' तिने मला विशेषणे दिली मी जास्त थाबण्यात अर्थ नाही असा विचार करून ताबडतोब पुढे झटकलो चान्स फुकट गेला

पुष्कळ पडिताना आणि होराभूषणाना मी आपली कुडली दाखविली, पण एकालाही याचे खरे आकलन झाले नाही

श्रीकृष्णाचा एक पाय अधू असावा असा बरेच दिवसाचा माझा तर्क होता, कारण कृष्ण नेहमी उभे राहण्याच्या वेळेस एका पायावर दुसऱ्या पायाची अढी घालून उभे राहत असत मग त्याच्या पायाला काय झाले होते कुणास ठाऊक बहुधा चोरून खाताना आपटून त्याच्या पायाचे हाड बरेच दुखावलेले असावे पण त्या काळी, क्ष किरणाची सोय नसल्यामुळे त्याचा तो पाय जन्मभर तसाच राहिला

एका पायाने अधू असून सुद्धा श्रीकृष्णाला १६१०८ बायका कशा मिळाल्या याचे कोडे बरेच दिवस मला सुटलेले नाही पण मी एकदा विचार केला, की श्रीकृष्ण नेहमी एका पायावर उभे राहात असल्यामुळे तसे काही झाले नसेल ना ? आणि त्यावरूनच बहुधा 'एका पायावर उभा असणे' ही म्हण प्रचारात आली असावी

एकदा अशीच एका मुलीची—छे, छे, युवतीची अन् माझी ओळख झाली मी या प्रेमाच्या बाबतीत घाई करण्यात काही अर्थ नाही हा धडा चागलाच गिरवला होता. म्हणून दम धरला पण बऱ्याच दिवसानी आता प्रेम व्यक्त करावयास काहीच हरकत नाही असे वाटू लागले पण प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा लेखी तसे करणे चागले असे ठरविले कारण कोणतीही गोष्ट लेखी असल्याशिवाय सरकारात तिला मान नसतो एकाद्या कारकुनाला बायको बाळत झाल्याबद्दल दोन दिवस रजा हवी असेल, तर एकाद्या डॉक्टरचे सर्टिफिकेट घेऊन 'सिक नोट' पाठवावी लागते तेव्हा प्रेमाच्या बाबतीत तरी याचा उपयोग का करू नये ?

पण जसे सरकारी पत्र O H M S च्या पाकिटातूनच गेले पाहिजे, तसे प्रेमपत्र गुलाबी कागदावर लिहून ते गुलाबी पाकिटातूनच पाठविले पाहिजे असा शिष्टसमत मार्ग आहे पोस्टमनच्या हातात एकादे गुलाबी पाकिट दिसले, की हटकून ते प्रेमपत्र आहे असे समजावे मग प्रत्यक्ष हातात आल्यावर ती एकाद्याची 'बुकपोस्ट'ने पाठविलेली लग्नपत्रिका असली, किंवा एकाद्याचे 'बिल' असले तर गोष्ट वेगळी

तेव्हा मी गुलाबी पॅडची व पाकिटाची चौकशी केली पण गावातल्या एकाही दुकानात मिळेना शेवटी अगदी जुनाट अशा दुकानात असे पॅड व पाकिटे मिळाली पण तेही गुलाबी नव्हते बरेच दिवस दुकानात पडून राहिल्यामुळे व कोपऱ्यातून पावसाचे पाणी गळाल्यामुळे पॅडमधील काही कागदावर गुलाबी 'झाक' मारत होती पण मी असा विचार केला, की आपण कादबऱ्यातून तरुणीच्या गुलाबी गालाची वर्णने वाचतो, पण प्रत्यक्ष व्यवहारात कोणी गुलाबी गालाची तरुणी पाहिली आहे ? छातीठोकपणे कोणी सागू शकेल काय ?

तेव्हा ते खरेदी करून, पत्र पाठविले सोबत उत्तराकरिता पाऊण आणा पोस्टेज पाठविले होते

दोन दिवसातच खालील उत्तर आले

'आपण फार X X X झाला आहात, आता यापुढे पुन असा प्रकार केल्यास मला नाइलाजाने आपल्या वडिलाच्या कानावर घालावे लागेल '

शेवटी असल्या फदात पडण्यात काही अर्थ नाही, तो मार्ग आपल्या करता नाही, असे ठरविले

शेवटी 'न स्त्री स्वातत्र्यमर्हति' हे मनुस्मृतीतील वचन आठवले

आपले पूर्वज खरोखरच शहाणे होते एरवी उगीच त्यानी 'अष्ट-वर्षा भवेत् कन्या' इ० सागितले नसले पाहिजे

—विहार

## लग्नघर ◆ ◆ ◆ १३

लग्नघर हा शब्द उच्चारल्याबरोबर मनश्चक्षूपुढे एक ठराविक देखावा उभा राहतो ते दाराशी उभे केलेले केळीचे—सोपट काढलेले खाब त्याला आलेला बारीक केळाचा घड घडाच्या शेवटी पाकळ्या गळून गेलेले बारीकसे केळफूल !

दारावर नुकतेच ठोकलेले गणपतीचे चित्र आणि चौकटीवर आडवी बाधलेली, मध्ये नारळ असलेली—सोनेरी माळ हे दृश्य ज्या घरावरून जाताना दिसेल तेथे कोणाचे तरी लग्न आहे असे हटकून समजावे दाराशी एकादी मोटार अगर टागा उभा असतोच, त्या टागेवाल्याचे गिऱ्हाईक आतल्या 'लगीनघाईत' कुठे तरी बेपत्ता झालेले असते अन् तो पैसे देण्याची वाट पाहात बाहेर उभा असतो दारातून थोडेसे आत डोकावल्यास मधूनच 'पे पे' किवा 'टम् टम्' असा वाजत्रीचा आवाज येतो

मधे अगण असल्यास (आणि बहुधा असलेच ते) त्यावर उभारलेला माडव आणि माडवात मधेच एकादी फाटकी सतरजी (कुणाची तरी मागून आणलेली) टाकलेली असते सतरजीवर 'चिम्या, गोप्या किवा ठकी, सई' खेळत असतात आतल्या बाजूला बायका नवी लुगडी नेसून आणि नाकात नथ घालून (नथेमुळे मेनिंजाइटिस होतो किवा नाक साफ राहते यापैकी खरे कोणचे हे बिचाऱ्याना ठाऊक नसते, तो वाद पुरुषानीच करावा ) आणि पदर खोवून काम करीत असतात पण त्याचे कामापेक्षा स्वत च्या पोराकडेच जास्त लक्ष असते कारण मुलाला घातलेले नवीन कपडे, जरीची टोपी, पोरे कोठे जाऊन घाण करतील याचा नेम

नसतो मूल अगदीच रागते असल्यास कुणाच्या तरी पायाखाली गडबडीत तुडवले जाण्याचा सभव असतो (सततिनियमनाचे महत्त्व पुरुषानी समजावून द्यावे). म्हातान्या बायका कोठे तरी एका कोपन्यात बसून इतराना 'ऑर्डर' देत असतात मधूनच कोणी तरी येऊन त्याना विचारते, ' अहो आजीबाई, लाडवात साखर किती घालायची ! ' इतक्यात दुसरे कोणी तरी विचारते, ' आजीबाई ते शेण आणलय् त्या मोलकरणीन ते कुठ ठेवायला सागू ?' परतु या सर्वांना आजीबाई शातपणाने उत्तरे देत असतात कारण त्याच्या आयुष्यात त्यानी कित्येकाची लग्नकार्ये केलेली आणि पाहिलेली असतात गोठ्यात किवा अगणाच्या अगदी एका कोपन्याला पडद्याआड मोठमोठ्या चुली घातलेल्या असतात त्यामुळे गोठ्याची अगदी खराबी होते

❋ ❋ ❋

आपण या लग्नघराचा इतिहास पहिल्यापासून पाहू

कोणा तरी मुलीचे वडील कोणा तरी मुलाच्या वडिलाकडे स्थळाची चौकशी करण्याकरता जातात

मग मुलगा मुलगी पाहून काय ते ठरवतो मुलगी पसत झाल्यावर हुड्याची घासाघीस होते या वेळी मुलाचा आतापर्यंत झालेला शिक्षणाचा खर्च बहुधा पै न् पै भरून घेतात शिवाय आम्ही मुलाला विलायतेला पाठविणार आहोत अशा थापा देऊनही कित्येक बाप पैसे उकळतात पण मुलीचा बाप 'अडला नारायण' असल्याकारणाने तो कसेबसे कर्ज काढून ही बाब मिटवण्याचा प्रयत्न करतो या सर्व गोष्टी झाल्यावर मग भटजीकडून लग्नाचा मुहूर्त नक्की करतात

आणि मग खुद्द लग्नाच्या तयारीस सुरुवात होते आधी बायका कापड, लुगडी, चोळ्याचे खण आणण्याकरता घरातील पुरुषाच्या मागे सारखे टुमणे लावतात नेहमीच्या कापडवाल्याकडून कापड वगैरे उधारी-वरच आणले जाते नेहमीचा शिंपी ते शिवतो मग ' यमूताईंना कोणचा खण द्यावा ? त्या अमक्या बाईन तिच्या पुतण्याच्या लग्नात मला असल लुगड दिल होतं, आता तिला कसल द्याव ' अशा तऱ्हेचे आर्थिक घासाघासीचे

प्रश्न सुरू होतात कारण थोडक्या खर्चांत जास्त मोठेपणा आपणाला कसा मिळविता येईल अशी प्रत्येक स्त्रीपुरुषाची त्यातले त्यात स्त्रियाची इच्छा असते

पधरा रुपयाचे लुगडे असेल तर कापडवाल्याकडून पचविसाची चिठ्ठी घेऊन ती लुगड्याच्या घडीच्या आतल्या बाजूला टाचून ठेवतात

नतर घरातली बाकीची तयारी पापड, पापड्या, शेवया, साडगे वगैरे या तयारीकरिता कुणी तरी 'उमामाई' कुणा तरी 'चिमाबाई'चे पाय धरते व ती चिमाबाईही एकादे लुगडे किवा खण मिळण्याच्या आशेनें कामाला येते डाळ, तादूळ निवडण्याकरिता घरच्या मोलकरणीकडूनच तिच्या ओळखीच्या आणखी बायका कामाला आणल्या जातात या वेळेला गमत अशी असते, की एरवी नाकाने वागी सोलणारी बाई अशा वेळीं मुकाट्याने दुसऱ्याचे पाय धरते, कारण सर्व गोष्टी शक्य तो फुकटात व्हाव्या अशी इच्छा असते

मामलेदार किवा एकाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या घरी जर का लग्न निघाले तर मग बिचाऱ्या कारकुनाचे अन् त्याच्या बायकाचे हाल अगदी विचारू नका त्या कारकुनाना आणि त्याच्या बायकाना वरिष्ठाची मर्जी सपादन करण्याकरिता रात्रदिवस राबावे लागते, आणि गमत अशी, कीं एरवी एवढ्या तेवढ्या चुकीवरून पितराचा उद्धार करणारा अधिकारी, या चार आठ दिवसात कारकुनाने अजिबात काम केले नाही तरी मुळींच बोलत नाही

इकडे पुरुषही गडबडीत असतात. निमत्रणाच्या याद्या, जेवणाची मडळी निराळी, नुसती लग्नाकरिता पानसुपारीला बोलावणाऱ्या मडळीची यादी निराळी, एक का भानगड असते ? हो ?—अहो नाही तर शभराच्या ऐवजी ऐन वेळी दोनदोनशे लोक जेवायला आल्याचीही उदाहरणे काहीं जण सागतात

तसेच माडवाचे कत्राट कोणाला द्यावयाचे, बँड कोणाचा लावावयाचा, कुणाची मोटार वरातीला मिळण्यासारखी आहे, फुलवाल्याला ऑर्डर किती

द्यावयाची, गॅसच्या बत्त्या किती आणावयाच्या, दारू (पिण्याची नव्हे) किती आणावयाची, वगैरे अनेक गोष्टी ठरवाव्या लागतात

* * *

एकाद्याकडे लग्न आहे, हे कळल्याबरोबर वरील सर्व निरनिराळ्या धद्याचे लोक वशिला लावण्याचा प्रयत्न करितात आणि मला वाटते या व्यापारी चढाओढीच्या दिवसात, थोड्याच दिवसात या धद्यातही 'टेण्डरे' मागवावी लागतील पोस्टाने निमत्रणपत्रिका पाठविल्या तर फार खर्च येतो म्हणून घरोघर निमत्रणपत्रिका वाटणारे काही पोस्टमनही येतात कारण पोस्टमनाना गावातल्या सर्व घराची खडान् खडा माहिती असते शिवाय ते अल्प वेतनावर काम करण्यास तयार असतात, शेलके लोक मात्र अक्षत आल्याशिवाय मुळीच येत नाहीत अर्थात् अशा शिष्टाना अलीकडे कोणी मानही देत नाही

इतक्या सर्व भानगडी झाल्या की दूरदूरचे नातलग, मित्र वगैरे हळू हळू येऊ लागतात स्वत चे लग्न रजिस्टर पद्धतीने करून इतराच्या लग्नाला हजर राहणारे काही सुधारक मोठे धूर्त व दूरदर्शी असतात कारण लग्नाच्या निमित्ताने चार दिवस हवापालट होऊन चैन करावयाला मिळते दोन्ही वेळा चमचमीत जेवण व दररोज एकादे तरी नाटक-सिनेमा (यजमानाच्या पैशाने) ते पाहतात शिवाय येण्याजाण्याचे भाडेही पदरात पडते.

इतकी सगळी तयारी झाली की ठरलेल्या वेळी भटजीच्या लाब सुरातल्या मगलाष्टकात माडवात घातलेल्या बोहल्यावर दोन जीव एकमेकास कायमचे निगडित होतात

लग्नमडपात इतक्या तऱ्हेचे लोक जमलेले असतात, की प्रत्येकाच्या मनात काय विचार चालले आहेत हे ब्रह्मदेवाला देखील ओळखता यावयाचे नाही.

दिवाणखान्यात पिवळ्या पगड्या घालून बसलेले पेन्शनर काही निराळ्याच विषयावर वाद करीत असतात त्याचा बोलण्याचा विषय

बहुतेक मागच्या आठवणी हा असतो त्यानतर पिवळा रेशमी कोट घालून त्यावर कोशा बाधलेले मध्यम वयाचे लोक हे बहुधा एकदा तरी भटजीनी 'शुभमगल सावधान' म्हटल्यावर मधून मधून अक्षता टाकतात पण पहिल्यादा सागितलेल्या पेन्शनर लोकाच्या अक्षता एकदा शेवटीच, ज्या वेळी आपण 'लग्न लागले' असे म्हणतो, जेव्हा टाळयाचा कडकडाट व बँडचा धुमधडाका होतो, तेव्हाच पडतात आणि त्याही माडवावरच

यानतरचा वर्ग विधुराचा हे लोक लग्नाला आलेल्या ( म्हणजे वयात आलेल्या नव्हे ) पोरीबाळीकडे पाहून आपल्याला यातली एकादी मिळेल व आपलेही केव्हा तरी असेच 'वाजेल' तर बरे असा विचार करीत सशोधन करीत असतात

यानतर विद्यार्थीवर्ग व नवऱ्या मुलाचे मित्र यापैकी काही वात्रट लोक वहिनीच्या किवा स्वत च्या मित्राच्या डोक्यावर जोराने अक्षता मारून आपली हौस फेडून घेतात याच्याखाली लहान पोरे—झिरमिळाची जरीची टोपी व नवा कोट व आईने धपका मारून चल कार्ट्या नवाच लग्न आहे अन् इथच साडेनऊ झाले ? असे म्हणून घातलेली—( परटाकडून मुद्दाम तगादा करून आणलेली ) चड्डी घालून बँडवाल्याच्या भोवती मजा पाहात असतात बोहल्यावरच्या मजेची त्याना अजून कल्पनाच नसते अगदी लहान मुले आईच्या कडेवर बसून रडत असतात व डोक्यावरची मोराची टोपी तीनतीनदा फेकून देण्याचा प्रयत्न करतात

जसे पुरुषाच्यात अनेकविध प्रकार सागितले तसेच स्त्रियाच्यातही असतात

अगदी परकरी पोरी आपल्या ताई किवा अक्काजवळ उभ्या राहून गमत बघत असतात

साधारण सोळा सतरा वर्षे वयाच्या मुली 'आपलेही एकदा असेच होणार' असा विचार करीत, नव्या लुगड्याचा पदर तीनतीनदा सावरीत उभ्या असतात

मध्यम वयाच्या बायका अगदी गभीरतेने भटजीच्या प्रत्येक 'शुभ-मगल सावधान'च्या शेवटी अक्षता टाकतात यानतर अगदी वृद्ध स्त्रिया या बहुधा जाळीच्या आडून नवऱ्या मुलीकडे टक लावून पाहात असतात, आणि तिच्या रूपावर, लुगड्यावर, भावी मिळणाऱ्या दागिन्यावर याची चर्चा सुरू असते 'ती देशमुखाची सूनच अशी होती' किंवा 'अहो त्या राधाबाईंचा नवरा पितो म्हणे', किंवा 'मग दोन हजार म्हणजे कमी का हुडा झाला?', 'अखेर इतके दिवस थाबून आबानी नकटीच बायको पत्करली', किंवा 'अहो त्या काळ्या टेण्याच लग्न झाल की?' अशा तऱ्हेच्या अनेकविध विषयासबधी हळू हळू कुजबूज सुरू असते.

भटजी मारे आवाज सप्तकात चढवून आणि त्याबरोबरच हातातील अतरपाट वर धरून मगलाष्टके म्हणत असतात त्या चार भटजीचे चार निराळे सूर असतात बँडवाले अगदी जिवाचा आटापिटा करून बडवीत असतात, पण वधूवराच्या अत करणातल्या धडाधडीपुढे ती काहीच नसते. एकदा लग्न लागले, की मग सप्तपदी वगैरे विधि मग जेवणाचा कार्यक्रम. या वेळी मोठमोठ्या धेडाच्या आग्रहावरून नवऱ्या मुलाच्या डाव्या हाताला पाट माडतात, व वधूकडून घास देवविला जातो

या वेळी तरी काय? नुसते दोन घास घालावयाचे असतात पण त्यात अर्धा तास जातो आधी वधू 'लवकर येऊ द्या' अशा आरोळ्या सुरू होतात मग वधू पानावर आल्यावर अडीच मिनिटे शक्य तितके चोरून नीटनेटके खाली मान घालून बसण्यात खर्च होतात नतर (आधीच तयार केलेल्या) आजूबाजूच्या एकाद्या धीट लहान पोरीकडून 'तिकडच' नाव घेण्याचा उखाणा सागितला जातो इतक्यात लोक 'ह लवकर आटपा, लवकर आटपा' असा ओरडा करीतच असतात इतका आग्रह लोकानीं केल्यावर—केवळ 'लोकाग्रहास्तव' असे सागणाऱ्या व खेळ वाढविणाऱ्या नाटक सिनेमाप्रमाणे—अगदी स्वत लाच ऐकू येईल असे हळूच नाव घेऊन वधू जिलबीचा लहानसा तुकडा तोडात घालते तेवढ्यात 'ऐकू आल नाही, मोठ्यादा म्हणा' असा गलका होतो व पुन पहिल्याच प्रकाराची पुनरावृत्ति थोड्या मोठ्या आवाजात होते, का या वेळेला लोक गप्प असल्यामुळें ऐकू

येते किंवा काय न कळे कारण पहिल्यादा जितकी गडबड चालू असते तितकी आता नसते जो तो कान टवकारून व डोळे विस्फारून वधूकडे पाहात असतो प्रत्येक जण दुसऱ्याला शू शू, ऐका, असा उपदेश करीत असतो आचारी जिलब्याचे ताट घेऊन वाटेतच 'खड्या पारशा'प्रमाणें उभा असतो मावशीबाई मठ्ठा हातात घेऊन उभ्याच असतात

❈ ❈ ❈

हा सोहळा झाला की मग तिकडून एकवचनी सबोधन वापरून याची परतफेड करण्यात येते

रात्री वरात—

ही वरात का काढतात कुणास ठाऊक कारण ज्या मोटारीतून वरात निघावयाची असते त्यात चिल्ल्यापिल्ल्याची इतकी खेचाखेच असते कीं, त्यापुढे एम् एस् एम् रेल्वेचा थर्ड क्लासचा डबा पुरवला असे म्हणण्याची वधूवरावर पाळी येते मोटारीतून कुणाची धिंड—नव्हे वरात —काढावयाची हा प्रश्नच असतो कारण प्रत्येक मुलाची आई 'अहो आमच्या बाब्याला बसवा हो' म्हणून सारखी पुढे पुढे करीत असते. नवऱ्या मुलाच्या पायाशी, माडीवर, ड्रायव्हरशेजारी, मडगार्डवर, फूटबोर्डवर, तिच्या माडीवर, मुलाची इतकी रेलचेल अन् खेटाखेटी असते की ही मोटार मुलाच्याकरता आहे का वरातीकरता आहे असा लोकाना एकादे वेळेस प्रश्न पडावयाचा जणू काय इतकी मुले झाली तर तुम्ही त्याची कशी व्यवस्था कराल हे पाहण्याकरताच सुज्ञ लोक हा डाव योजतात किंवा काय न कळे ?

रात्री वरात झाल्यावर मग पत्ते वगैरे

सात आठ दिवसातच 'तिकडची' चागली ओळख होते व बोला-चालीस (म्हणजे भाडाभाडीस नव्हे) सुरुवात होते

या सर्व गोष्टी झाल्या की मग माडवपरातणे वगैरे

लोकाच्या मागून आणलेल्या जिनसा परत कराव्या लागतात काहीं भाडी हरवलेली असतात, काही पाट बेपत्ता होतात, ताबे, भाडीं बदलतात, या सर्वांची वासलात लावावी लागते. आलेली पाहुणे-मडळी घरी गेलेली

असतात कोणी काय काय आहेर दिला वगैरे जिनसाची मोजमापे सुरू होतात. रिस्ट वॉचेस, फौन्टन पेन्स, फोटोफरेम्स, दौती वगैरेचा ढीग होतो आणि या जिनसाचे दुकान काढून बसण्याची वेळ येते

❋ ❋ ❋

काही दिवसानी कापडवाला, वाणी व शिपी याची बिले येतात आणि मग डोळे पाढरे व्हायची वेळ येते मग दादा, बाबा करून कुणाचे तरी कर्ज काढून याची बिले भागवावी लागतात आणि दिवसेदिवस व्याज वाढत जाऊन तो मनुष्य कर्जांतच बुडून जातो हौसेने मुलाचे अगर मुलीचे लग्न करणारे पालक शेवटी अन्नान्न दशेला लागतात

कोणाकडे लग्न आहे हे मला कळले की त्या माणसाची मला कीव येते इग्रजीत एक म्हण आहे की, 'मूर्ख माणसे घरे बाधतात व शहाणे लोक त्यात राहतात' त्याप्रमाणे लग्न एकाचे तर लग्नाला घर दुसऱ्याचेच असते, त्यामुळे घर बाधणारा मूर्ख ठरतो, कारण दुसऱ्याला लग्नात घर वापरावयाला दिल्यानतर त्याची इतकी खराबी होते की विचारावयाची सोय नाही. चागल्या रग दिलेल्या भिंतीवर विड्याचे ताबडे डाग, अगणात माडव घातलेल्या खाबाचे खळगे, चुलीची राखाडी, इत्यादि

ज्यानी गालिचे व लोड वापरावयाला दिले असतील त्याची दैना तर विचारूच नका बिचाऱ्याना ते जिन्नस परत येईतोपर्यंत सुखाने झोप तरी येत असेल किंवा नाही शकाच आहे कारण नव्या गालिचाला चुन्याचे, मुलांच्या विधीचे डाग पडून पुन वापरण्याची काही सोय राहात नाही

प्रत्येकाच्या आयुष्यात अत्यत महत्त्वाचा विधि पण त्याची अशी स्थिति असते. लग्न झाल्यावर त्या घरातील माणसे श्रमाने व कामाने आजारी पडतात व डॉक्टरचे पोट भरते इतक्या खर्चांत हा पाचपचवीस रुपये खर्च होतो

'लग्न करून पाहाव' अशासारख्या म्हणीपासून बोध घेण्याऐवजी आपल्याला एक प्रकारची गमतच वाटते

प्रत्येकाला समजत असते पण उमजत नाही या रूढी वाईट आहेत हे प्रत्येक जण कबूल करील पण धडाडीने टाकून देण्यास तयार होणार नाही.

आजकालच्या आर्थिक मदाईच्या दिवसात लग्नकार्यासारख्या प्रसगी चार पाचशें रुपये खर्च करणे हा शुद्ध मूर्खपणा आहे पण प्रत्येक जण तो करतो तो मोह त्याला आवरत नाही विशेषत बायका या बाबतीत फार हावऱ्या असतात पण त्याना शिकवून अशा तऱ्हेच्या अधश्रद्धा व वाईट रूढी नाहीशा केल्या पाहिजेत शक्य तितक्या थोड्या खर्चांत लग्न करण्यास शिकले पाहिजे

❖ ❖ ❖

आज खेडेगावातील शेकडो शेतकरी या लग्नाच्या कर्जाच्या पायी भिकारी झाले आहेत त्याच्यातल्या गावजेवणासारख्या चाली त्याना रसातळाला नेत आहेत ही अधोगति थाबवावयाची असेल तर विवाह-सस्थेत सुधारणा करा ती केली नाही तर देशाच्या भावी पिढीचे शाप तुम्हाला सहन करावे लागतील

—स्वराज्य

# शिंप्याच्या दुकानांत ◆ ◆ १४

[ स्थळ —एक शिंप्याचे दुकान आतल्या बाजूला पाच सहा लोक मशिनवर काम करीत बसले आहेत दोन शिकाऊ पोरे काजे, गुड्या शिवत आहेत दुकानाचे मालक मोठी कात्री घेऊन टेबलावर कापड कापीत आहेत

दुकानात हरतऱ्हेचे पाश्चात्य स्त्री-पुरुषाचे हरतऱ्हेच्या वेषातील फोटो लावलेले आहेत तसे कपडे अजून कोणीच त्या दुकानात शिवलेले नाहीत ही गोष्ट वेगळी ! बाजूच्या भिंतीवर फार प्राचीन काळी मिळालेली सर्टिफिकेट्स, डिप्लोमे वगैरे लावलेले आहेत

अगदी बारकाईने पाहिल्यास दुकानाच्या पाटीवर पुढील मजकूर दिसू शकतो—

आधुनिक टेलरिंग फर्म

येथे सर्व तऱ्हेचे स्त्री-पुरुषाचे कपडे उत्तम शिवून मिळतील तसेच उत्तम मिलिटरी टेलर कामे वक्तशीर होतात

एकच वेळ अनुभव घ्या

स्थापना १९१३ प्रो. गणोबा पाडुरग तेरडे.

बिचाऱ्याला मिलिटरीचे राहोच पण एकाद्या पोलीस शिपायाचा जुना कपडा तरी शिवायला आला होता की नाही याची शका आहे.

वेळ सकाळी साडेनऊ—काम सुरू आहे—

एक आबा चारपाच वर्षांच्या पोराला घेऊन येतात त्याच्या

हातातल्या झोळीवरून ते नुकतेच मंडईची सफर करून आले आहेत हे सांगायला नकोच ]

मालक—या गोपाळराव ..

गोपाळराव—ह्—झाल्या का चिम्याच्या चड्ड्या ?—द्या बर बांधून अगदी तुम्ही सांगितल्याप्रमाणं वेळेला आलोय् !

मालक—काय रे झाल्या का याच्या चड्ड्या काय ? वेळ आहे ? अजून थोडा वेळ आहे—जाऊन या थोडे—बांधून ठेवतोच.

गोपाळराव—अहो आता किती दिवस लावणार? सगळ्या विजारी फाटल्या-यत् म्हणून याची आई सारखी ओरडतीय् ! आता तिला काय सांगू? ते काही नाही आताच द्या तुम्हाला काय होतं, पण आम्हाला घरीं मंडळी बोलतात !

मालक (हसत)—संध्याकाळी नक्की देतोच हे पाहा आत काम सुरूच आहे.

[ गोपाळराव घरी उशीर होईल म्हणून तणतणत भाजी घेऊन भराभरा चालू लागतात ]

दुसरे एक गिऱ्हाईक हातात टेनिस रॅकेट वगैरे घेऊन येते

गिऱ्हाईक—मिस्टर गणपूनाना, या कोटाची रोल कॉलर अॅबसोल्यूटली बिघडली म्हणूनच नेहमी बॉबेला शिवतो मी ! अन् एक बटन लावायला सांगितलं होतं ते तीन काय लावलीत ? छे, छे नॉन्सेन्स—डॅम धिस् कोट

मालक—कॉलर अशीच बसणार कॅन्व्हस धुतल्यावर आकसेल तेव्हा ठीक होईल वुलनची कॉलर नीट बसते, कॉटनला तो शेप जमत नाही आपण एक वुलन सूट टाका एकदा अन् मग पाहा !

गिऱ्हाईक—नो, नो टॉक अबाउट धिस्—हा केव्हा दुरुस्त करता ? बोला

मालक—परवा या आपण—उत्तम करतो !

[ एक बाई टांग्यातून उतरतात. ]

बाई—इश्श ! अहो या ब्लाऊजचा कोठा सैल किती केलात ?—तुम्हाला दुसरा ब्लाऊज बेतायला दिला होता ना ?

मालक—त्याच्यावरनच माप घेतलय्—अन् आपण सांगितला तसा शिवला.

बाई—इश्श ! अहो कोठ्याला एक बोट घट्ट करा म्हणून म्हटल होत अन् उचीला दीड बोट जास्त हवा अन् ही झालर नीट नाही लावली !

मालक—ठेवतो करून उद्याला

बाई—इश्श ! उद्या काय उपयोग ? दुपारी द्या आज मला 'ह्याच्या' बरोबर रात्री 'पराच्या कावळ्याला' जायचय् !

मालक—पाहातो शक्य तो पण उद्या नक्की

[ बाई जातात ]

वेळ दुपारी साडेतीननतर—

एक कॉलेज स्टुडट—काय झाले का पायजमे ? अस धोतर नेसून कस हिडू गावातून ? सगळा गाव माझ्याकडे पाहातो छे छे, तुम्हा लोकाना एटिकेट्स् केव्हा कळायच्या ?

[ मालक दुकानात नसतात तेव्हा दुकानाचा गडीच कपाटातून पायजमे काढून बाधून देतो बिल चुकते करून गिऱ्हाईक जाते

मालक येतात बरोबर एक दोघे उगीचच हय हय करीत पान चघळीत दुकानात शिरतात

त्यापैकी एक सुपारी कात्रीत असतात. ]

एक—मग काय म्हणता हे टेनन्सी बिल पास होणार तर !

दुसरे—कसल काय अन् कसल काय ! काँग्रेसज म्हणजे असच आता फेडरेशन आल म्हणजे बसा म्हणाव !

पहिले—ते तर येणारच अहो येणारच अहो साहेबान ठरवल म्हणजे ठरवल मग ते तुमच्या सत्यमूर्तीनाही विचारीत नाहीत अन् सुभाष-बाबूनाही विचारीत नाहीत

मालक—अहो आम्ही कपडेसुद्धा त्याच्यासारखे करतो, मग त्याच राज्य का नको ?

[ ते दोघे हय हय हसतात ]

पहिले—काय लाख बोललात या वेळी—फेडरेशन.. पाकिस्तान अरबस्तान...

दुसरे—मग काय गणपतराव, चहा मागवताय् का ?

मालक—जारे पोऱ्या, तीन सिगल साग आज खूष आहेत गोपाळराव.

[ मालक पोऱ्याला चहा आणायला सागतात काय करणार बिचारे ! ते दोघे म्हणजे त्याच्या दुकानाचे आज बरेच दिवस टिकलेले गिऱ्हाईक होते त्याच्यापैकी पहिल्या गृहस्थाने फार पुरातन काळी चार सदरे शिवले होते, पैकी एका सदऱ्याचे बिल अजून वसूल व्हावयाचे आहे ]

एक खेडवळ गृहस्थ बिचकत बिचकत येतो

पावण—इथ चोळी शिवताल का ?

पहिले गृ०—ए, पाटी वाचली नाहीस का? इथ स्त्री-पुरुषाचे कपडे शिवतात !
चोळ्या शिवतात होय इथ लेका ?—अगदीच ताळ सोडला तुम्ही
लोकानी काँग्रेसच राज्य आल म्हणून !

दुसरे—शेफारू नका काँग्रेस आली म्हणून ! आता फेडरेशन आल म्हणजे....

मालक—पाहू बर कापड—चोळीच माप आहे का ?

[ पावण एक जुनी चोळी व कापड देतात ]—तीन आणे पडतील—आहे तयारी ? [ पावण कापड परत घेतात ]

मालक—मग काय देणार ?

पावण—सहा पैस.

मालक—नाही व्हायच तेवढ्यात [ पावण जातात ]

पहिले—पाहा म्हटल नाही मी—अहो याना सगळ स्वस्तात पाहिजे

दुसरे—नाही तर काय ? मञ्यानी पगार कमी घेतला म्हणून चोळ्याचा
भाव का उतरतो ?

[ काय आपण विनोद केला ह्या ऐटीत आपणच हसतात ]

चहा येतो चहा वगैरे झाल्यावर मडळी जातात

मालक जुन्या चिंध्याची गाठोडी सोडून पाहतात त्याना हवा असलेला कपडा मिळत नाही ]

सध्याकाळी एक पगडीवाले येतात ती पगडी बहुधा त्याना त्याच्या लग्नात मिळालेली असावी. तिच्या मूळ रगाचा आता मागमूसही लागत नाही

पगडीवाले—मग काय गणपती—लावलस का जुन्या कोटाला ठिगळ ?

मालक—हो....लावतोच . येताना करून ठेवतो—घेऊनच जा जाताना !

पगडीवाले—हृयः हृय —अरे नुसती कॉलर लावायची ते इतके दिवस, मग सबध कोट उलटायला सागितला तर किती दिवस लावशील? आज दहा वर्षे तो कोट वापरतोय् म्हणून टाकवत नाही—अरे बाबा, जुने ते सोने कलेक्टरच्या सभेला जायचय्!

मालक—बर येताना या करून ठेवतोच!

[ रात्री आठाच्या सुमाराला ते पगडीघर पुन येतात ]

पगडी—काय, झाला का?

मालक—अहो काय सागायच .. ....तुमच नशीबच फुटक—त्या बद केलेल्या कपाटात मघाशी भला मोठा साप जाऊन बसलाय् अन् सगळया चिंध्या तर आत अडकल्या! तुमचा कोट बाहेर काढला मात्र फुऽऽस केलन्. आपली काही छाती होत नाही बुवा कपाट उघडावयाची आता नुसता कोट तसाच घेऊन जा मग पुन. केव्हा तरी करीन

पगडी—अस्स—काय गमत आहे हो! बर मग द्या झाल—आणीन पुन केव्हा तरी

मालक—हो हो अवश्य पण साप गेल्यावर आणा ह! नाही तर तुम्ही कपाट उघडा बुवा!

पगडी—छे छे .मला काय घाई आहे—सावकाश येईन.

मालक (गिऱ्हाईक गेल्यावर)—मरत का नाही म्हातारा उद्या! काय जग ओस पडायचय्—दीड लाख असतील जवळ पण थेरडा फाटका कोट घालतोय्—सापाची भीति घातली म्हाताऱ्याला, कसा टरकला पण.. ह ह ह!

[ रात्रीचे नऊ वाजतात कामगार लोक पैसे घेऊन घरीं जातात. दुकान बद होते. ]

—दरुष

# स्वभावाचें औषध ◆ ◆ ◆ १५

माझ्या एका मित्राचा अन् माझा कादबरीतल्या एका पात्राच्या स्वभावाविषयी खडाजगी वाद झाला त्याचे म्हणणे असे, की त्या पात्राचा स्वभाव बदलणे शक्य आहे आणि माझे म्हणणे होते, की तो मुळीच बदलणार नाही त्याच्यावरूनच पुढे मनुष्यस्वभावाविषयी बोलणे निघाले, अन् आम्ही निरनिराळ्या लोकाच्या स्वभावाविषयी चर्चा केली अर्थात् त्या चर्चेचा शेवट ‘स्वभावाला औषध नाही’ या ठराविक म्हणीने झाला

माझी आई तर नेहमी मला म्हणते, ‘तुला वाद घालायची खोडच आहे, तुझा स्वभाव कधी जायचा नाही’

कोणी ‘जित्याची खोड मेल्याशिवाय जायची नाही’ अस म्हटल म्हणजे मी विचारात पडतो खरच का मनुष्यस्वभाव बदलण इतक कठिण आहे? पण अलीकडच्या या विज्ञान युगात किती तरी अगम्य चमत्कार झालेले आपण पाहतोच ना? हजारो मैलावरच्या माणसाशी टेलिफोनने बोलता येते, दूरच्या देशातील सगीत घरी बसून रेडिओ आपल्याला ऐकवितो, विमानात बसून पक्ष्याशी आपण बरोबरी करू शकतो एका काळी अगदी हास्यास्पद अशा वाटणाऱ्या या गोष्टी आपण प्रत्यक्ष अनुभवितोच की नाही? मग समजा एकाद्या शास्त्रज्ञाने मनुष्यस्वभावावर औषध काढले तर काय बहार होईल सर्व लोकाचा स्वभाव सारखा!

लोक माझी वेड्यात गणना करतील. ‘अहो, याच्या स्वभावाला औषध आहे का?’ एकाद्या पत्नीने तुम्हाला विचारले किंवा ‘आमच्या मालकाच्या तापट स्वभावाला काही औषध सागा बुवा’ असे एकादा नोकर

तुम्हाला म्हणाला, तर तुम्ही हसत त्याला सागाल, ' बेटया आता काळजी करू नकोस, लौकरच तस औषध निघणार आहे '

जगात इतके विविध स्वभावाचे नमुने आहेत जग हे स्वभावसग्रहालय आहे समाजात कोठेही निरखून पाहा दोन चेहरे, दोन स्वभाव, दोन डॉक्टर, दोन घडयाळे क्वचितच एकमेकाशी जमतील आणि असे असून सुद्धा आपण समाजात कसे राहतो ? त्याचे उत्तर हेच, की भिन्न स्वभाव. आश्चर्य वाटेल हे वाचून पण तुम्हीच थोडा विचार करा—आपण पुष्कळ वेळा लोकाशी मिळते घेण्याचा का प्रयत्न करतो ? फटकळ माणसाचे नेहमी इतराशी भाडण होते ते का ? उत्तर एक—स्वभाववैचित्र्य पुष्कळ वेळा लोकाचे म्हणणे आपल्याला पटत नसताना सुद्धा गप्प बसून ऐकावे लागते. कारण, गप्प बसण्यातच पुष्कळ वेळा शहाणपणा असतो

आणि समजा, की मनुष्यस्वभावावर औषध निघाले आणि सरकारने लोकाना ते सक्तीने टोचले तर काय होईल ? आतापर्यंत किती तरी लेखकानी कथा, कादबऱ्या, नाटके यात मनुष्यस्वभावाचा परिपोष केला टीकाकारानी त्याच्यावर टीकेची झोड उठविली वाचकानी मिटक्या मारीत वाङमय वाचले. ती सर्व पाने निस्तेज होतील प्रोफेसराना मनुष्य-स्वभावाची ही गुतागुत घसा फोडून सागावी लागणार नाही लेखक हा प्राणी यापुढे मिळणार नाही. कारण, त्याची स्फूर्ति जाईल आपण लोकाना, हसतो, पण यापुढे हास्य हा पदार्थच नाहीसा होईल सर्व लोक गभीर होतील आज हजारो वर्षे निरनिराळ्या तत्त्वज्ञानी मानवाच्या बुद्धीसबधी विचार करण्यात घालविली ॲरिस्टॉटल, प्लेटो, ख्राइस्ट, बुद्ध, शकराचार्य इत्यादि पूर्वीचे व हेगेल, नित्से, वेल्स, रसेल वगैरे अलीकडच्या लेखकाचे श्रम फुकट जातील. कारण, मनुष्याच्या बुद्धीचे कप्पे बद होऊन तो एकाच साच्याचा बनेल.

राष्ट्रात एकाच स्वभावाचे लोक असल्यामुळे पक्षभेद नष्ट होतील. यामुळें लोकशाहीची वाढ खुटेल आणि हुकूमशाही निर्माण होईल क्रात्या, रक्तपात, खून, दगे, चोऱ्या नाहीशा होतील आणि सरकारचे काम आपो-आप कमी होईल. सर्व लोक एकच धदा करू लागल्याने निरनिराळ्या

मालाची पैदास होणार नाही यापुढे घटस्फोट होणार नाहीत कारण सर्व स्त्रीपुरुषाचा स्वभाव पटेल. त्यामुळे भाडणे कमी होतील, आदळ-आपट कमी होईल, गलबला कमी होईल, माणसे शाततेने राहतील आपल्या-प्रमाणेच दुसरा असल्यामुळे लोकाना कोणावर विश्वास ठेवावा असा पेच पडणार नाही

पण या गोष्टीमुळे आयुष्याला एककल्लीपणाच येणार नाही का? विविधता आहे म्हणून जगात मौज आहे

मग असल्या औषधाने फायद्यापेक्षा तोटाच जास्त होईल

म्हणून लोकानी जरी तुम्हाला नावे ठेवली, तुमच्या स्वभावावर टीका केली तरी तिकडे लक्ष न देता आपले कार्य करीत राहा

त्यातच मानवजातीचे जास्त हित आहे

—मन्वन्तर.

# आगगाडी आणि ध्येय ◆ ◆ १६

परवा मी मुबईहून पुण्याला येत होतो लहान स्टेशने मागे टाकून मेल भराभर पुढे चालली होती स्टेशनवर उभ्या असलेल्या उतारूचे चेहरे अस्पष्ट दिसून क्षणार्धात नाहीसे होत होते

का कोणास ठाऊक पण त्या उतारूपेक्षा आपण कोणी तरी श्रेष्ठ आहोत अशी एक कल्पना येऊन गेली मला त्यातच एक विजयानदाचा आनद वाटत होता वास्तविक मीही असाच स्टेशनवर गाडीची वाट पाहात उभा असताना, एकादी गाडी न थाबता निघून गेली म्हणजे मनातल्या मनात रेल्वेला शिव्या द्यायचा ! आणि आतले उतारू आमच्याकडे पाहून हसताहेत असा भास झाला, की मला त्याचा हेवा वाटायचा पण आता मीही त्याच परिस्थितीत होतो आणि इतर जसे माझ्याकडे पाहून उपहासाने हसले असतील, त्याचे उट्टे मी फेडून घेत होतो जाताना पॅसेजरने गेलो. प्रत्येक स्टेशनवर ती थाबे उतारूची चढउतार—गर्दी ! अगदी कटाळा आला होता प्रवासाचा पण तोच मेलचा प्रवास किती सुखी—किती लौकर

मला वाटले मेल म्हणजे नुसत्या ध्येयवाद्यासारखी आपण बरे की आपले ध्येय बरे ध्येयसाधनाच्या मार्गात जेवढयाची मदत लागेल तितक्याची घ्यावयाची व ध्येयाचा मार्ग झपाटयाने आक्रमण करावयास लागावयाचे. काही ठराविक स्टेशनवर थाबून गाडी जणू काही पुढच्या मार्गांची विचारपूसच करीत होती घाटात दोन एजिन्स लावतात—

माझ्या मनात विचार आला मनुष्याचे ध्येय निश्चित असले म्हणजे

थोड्या उत्तेजनाने सुद्धा तो पुढे सरकत नाही का ? गाडीला सुद्धा म्हणूनच दोन एंजिन्स लावतात अडचणीचा घाट ओलांडला की काम झाले पुन आपण बरे की ध्येय बरे

आणि पॅसेंजर म्हणजे सामान्य जनाप्रमाणे मेल काय किंवा पॅसेंजर काय दोघींचे ध्येय एकच—पण ध्येयसाध्याच्या गतीत बदल अखिल प्राणिमात्राचे शेवटी ध्येय एकच—सुख! पण साधने व गतीत बदल

काही लोक ठराविक ध्येय गाठणारे असतात. आपली कुवत त्याना माहीत असते तितके अतर गेले की फिरून मागे यायचे, आणि समध्येयी असतील त्याना त्या ध्येयाप्रत नेऊन पोचवावयाचे ठराविक अतराच्या गाड्या (Locals) या माणसाप्रमाणेच असतील काय ?

ध्येय एक—सुख—आनद सर्व प्राणिमात्राची धडपड त्या एकाच ध्येयासाठी पण जसे रेल्वेचे रूळ भिन्न व साधे अनेक तद्वतच ध्येय एक असले तरी मार्ग भिन्न पुन एक, पुन भिन्न व पुन शेवटी एकच!

ध्येयविहीन मनुष्य म्हणजे स्टेशनवर उभ्या राहिलेल्या रिकाम्या गाडीप्रमाणे गाडी उभी असल्यावर एंजिन श्वासोच्छ्वास करील—पण नुसत्या श्वासोच्छ्वास करणाऱ्या माणसापेक्षा हालचाल करून ध्येयप्राप्तीसाठी धडपडणाऱ्याची योग्यता जशी अधिक तद्वतच उभ्या राहिलेल्या गाडीपेक्षा झपाट्याने जाणाऱ्या गाडीतच चैतन्य जास्त.

आणि या विचाराच्या पाठीमागून दुसरा विचार आला गुलामगिरीत पडलेला देश म्हणजे थाबलेली आगगाडी—स्वातत्र्यासाठी चळवळ म्हणजे श्वासोच्छ्वास आणि सपूर्ण स्वातत्र्य म्हणजेच खरे जीवन!

स्वातत्र्य म्हणजे सुख मग ते आध्यात्मिक असो अगर आधिभौतिक दृष्ट्या असो आध्यात्मिक स्वातत्र्य—सुख—म्हणजे तरी काय ? स्वत च्या शरीरावर आणि मनावर स्वत चा सपूर्ण ताबा असणे ना ? मग स्वत च्या राष्ट्रावर स्वत ची सपूर्ण मालकी म्हणजेच खरे स्वातत्र्य व तेच खरे सुख. आणि प्रत्येकाची धडपड सुखाकरता म्हणजेच स्वातत्र्याकरता चाललेली असते—

आणि श्वासोच्छ्वास करणारा मनुष्य जसा केव्हा तरी धडपड करणारच, त्याप्रमाणेच चळवळीनतर केव्हा तरी पूर्ण स्वातत्र्य निश्चित मिळणारच

—मन्वन्तर.

# हत्यारांचा कायदा ◆ ◆ १७

नुकताच तो सब्इन्स्पेक्टर झाला होता—

आपल्या पॉलिश केलेल्या पितळी बटणाकडे अन् चकचकीत बुटाकडे पाहून त्याची छाती साडेछत्तीसची सदतीस व्हायची.

तो आता एकादे 'सावज' गाठण्याच्या मागे होता. कारण लगेच त्याला बढती हवी होती मग इन्स्पेक्टर, मग डी एस् पी अन् मग—

एक दिवस सध्याकाळच्या वेळी तो ड्यूटीवर असताना एका अधाऱ्या बोळातून एक 'बगाराम' काखोटीत मळक्या अन् फाटक्या धोतरात काही तरी लाब जिन्नस गुडाळून लगबग चालले होते

'अहो ए ' त्याच्यातला सब्इन्स्पेक्टर जागा झाला.

'मी...' त्याने घाबरत विचारले ·

'ह .' तो गुरगुरला

'कुठ निघालास ? अन् हे काय ? ' साहेबाने विचारले

'ही हत्यार आहेत माझी .आज रात्रीचाच बेत आहे जाऊ द्या मला, उशीर होईल.' बगाराम घाबरत घाबरत बोलला.

सब्इन्स्पेक्टरच्या डोळ्यापुढे हत्याराचा कायदा उभा राहिला. कुठल्या तरी क्रातिकारकाच्या खटल्याची हकीकत त्याने वाचली होती. क्षणभर त्याचे अग शहारले.

'अरे बाप रे, काय भयकर माणूस आहे हा !'

त्याने उसने अवसान आणले

'ए साला बदमाष...माझ्याबरोबर चल.'

'कुठ ?'

'तुझ्या बापाकडे'

'साहेब तो स्वर्गात आहे' त्याने प्रामाणिकपणे सांगितले

'मग तुलाही पाठवतो'

त्यान त्याला गचाडी मारून चौकीवर नेल

'जमादार हा इसम ताब्यात घ्या साला राजरोस हत्यार वापरतो. लायसेन्स आहे का ? बदमाष'—सब्इन्स्पेक्टर साहेबाची 'करीअर' नुकतीच सुरू झाली होती, त्यामुळे हे शब्द म्हणजे फारच जहाल आहेत असे त्याना वाटत होते

जमादाराने खाडकन् त्याच्या मुस्काटात मारली.

'पाहू काय हत्यार आहेत ती बाकीची कुठयत् ?' जमादार बोलले.

'बाकीची दुसऱ्याजवळ मागून येणार आहेत ही जरूरीपुरती पुढ नेतोय्'

'सोड—पचनामा करू दे त्याचा'

'जाऊ द्या मला...माझ पोट त्याच्यावर आहे पुष्कळ गाव हिंडून पुण्याला आलोय् नुकताच या धद्यात पडलोय् अजून सगळ्या युक्त्या शिकलो नाही उमेदवार आहें'

'सोड ते—'

तो फडक्याची गाठ सोडू लागला—

बाहेर तुफान गर्दी उसळली होती कोण क्रांतिकारक पकडला म्हणून पाहण्याकरता फोटोग्राफर अन् रिपोर्टर आले होते

सब्इन्स्पेक्टर साहेब ऐटीत कमरेवर हात ठेवून उभे होते

आता आतून बदूक निघते का तरवार निघते इकडे सगळ्याचे डोळे लागले

त्याने गाठ सोडली—

आतून दोन झारे, एक पळी अन् एक उलथने बाहेर आले.

—*अप्रसिद्ध*

## गर्दी हटली ◆ ◆ ◆ १८

दारापुढे चिक्कार गर्दी झाली होती—

दुसऱ्या मजल्यावरून रडण्याचे आवाज जोरजोराने येत जो तो रस्त्यावर थाबून चौकशी करीत होता

कालच नवे बिऱ्हाड आल्यामुळे असा काही प्रकार असेल अशी कल्पनाच नव्हती

बाहेर गलका फारच वाढू लागला

भरवस्तीत भरदिवसा मारहाण ?—

कित्येक नाजूक लोकाना तो प्रकार मानवत नव्हता

कित्येक 'दलित वर्गीय' अरे ही बामन बी आमासारखीच की! असा विचार करून पुढे चालले होते

एक 'ज्यादा' गृहस्थ पोलिसला बोलावण्याची भाषा बोलत होते.

इतक्यात वरच्या मजल्यावर एक गृहस्थ सज्जात आले

'काय हो भरदिवसा मारहाण करता ? आता इतकी चढली तर रात्री काय होईल ? ' एका धीटाने नेटाने विचारले

'काही शरम—' ते गृहस्थ कडाडले

'मग रडारड कसली वर चाललीय् ?'

'गाण्याचा क्लास आहे माझा—उद्या पार्टी येईल'

माणसाची पागापाग झाली

—अप्रसिद्ध.

## कारण ?  ◆ ◆ ◆  १९

तो अलीकडे रोज पहाटे अन् रात्री फिरावयाला जाऊ लागला होता.

त्याच्या मित्राना आश्चर्य वाटले —

हिमालय पर्वताचे ज्वालामुखीत रूपातर होईल, सरहद्दीवरच्या पठाणाचा अहिंसेवर विश्वास बसेल, सस्थानिक प्रजेला राज्य देऊन निघून जातील, गिरणीवाले मजुराच्या ताब्यात गिरणी देतील, कॉंग्रेस आहे तशा स्वरूपांत फेडरेशनचा स्वीकार करील, मुस्लिम लीग व हिंदुमहासभा एक होतील—सर्व अशक्य गोष्टी एकादे वेळेस होतील; पण तो फिरावयाला जाईल ?—छे ! पण तो जाऊ लागला होता कारण ?

कधी फर्ग्युसन टेकडी, कधी लॉ कॉलेज, कधी शकरशेट रोड एक दोनदा तर तो रात्रीच्या 'शो'ला सुद्धा गेला आणि एके दिवशी सकाळी, लोकाना भूकपाचा धक्का जाणवला !

त्याला कुणी तरी सुरा दाखवला होता अन् हीच बातमी मोठ्या मथळ्यात छापून आली होती

त्याचे मित्र त्याच्याकडे गेले

तो सागू लागला, 'अरे करू काय ? माझ्या कविता तर कोणी छापीना अन् माझ्ञ ज्या मुलीवर प्रेम आहे तिच म्हणण होत, की एकदा तरी माझ्ञ नाव छापून आल पाहिजे पण ते यायच कस ? हैदराबाद सत्याग्रहाला जाव म्हटल तर ते फार लाब तेव्हा विचार केला फिरायला जाऊ. अनायासच हे सुरे-प्रकरण निघालय् पाहू कोण सुरा दाखवत

का ? तेवढंच नाव येईल. पण कोणी सुरा दाखवीना शेवटी मीच बनवून दिल अन् काय ? '

तो तिच्या घरी गेला —तो ती कडाडलीच त्याच्यावर.

' तुम्हाला सुरा दाखवला अन् तुम्ही शुभासारखे उभे राहिलात ना ? दोन ठोसे का नाही लगावले ? ज्याला स्वत च रक्षण करता येत नाही असला शेळपट 'तरुण म्हातारा' मला मुळीच नको अन् दोन पैसे सुद्धा तुमच्या खिशात नव्हते असले तर भिकारी तुम्ही ! ' ती खेकसली

' पण तुम्ही सागितल असत तर दोन पैसे ठेवले असते खिशात अन् ठोसेही दिले असते ! ' तो भीत भीत म्हणाला, ' तुमचा पण जिकण्यासाठी इतक करून शेवटी—? '

' चला चालते होता की कुत्रा सोडू अगावर ? मला तुमच्याशी कर्तव्य नाही '

तो तेथेच मूर्च्छित पडला —

—मौज.

# मतप्रचार ◆ ◆ ◆ २०

आजकाल जर कोणती गोष्ट प्रामुख्याने लोकाना दाखवावयाची असेल, पटवावयाची असेल तर त्याकरता ‘कष्ट’ केले पाहिजेत, प्रचार केला पाहिजे प्रत्येक व्यक्तीला आपले मत दुसऱ्याला सागण्याची तळमळ असते आपले म्हणणे दुसऱ्याला सागावे, पटवावे, वादविवाद करावा, ही मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे कोणतीही गोष्ट असो ती लोकापुढे माडून लोकानी कौतुक करावे असे प्रत्येकाला वाटते

लोकशाहीच्या युगात तर मतप्रचार अत्यत महत्त्वाचा असतो ज्या सरकारवर आपणाला दडपण आणावयाचे आहे, ज्याला आपल्या मताप्रमाणे कारभार करावयास लावावयाचा आहे, त्याकरता आधी लोकमत तयार केले पाहिजे एका व्यक्तीचे मत कधीही प्रभावी होऊ शकत नाही त्याकरता सघटना लागते व लोकजागृति करावी लागते

लोकशाही आणि मतप्रचार हे इतके जवळ आहेत, की एकावाचून दुसऱ्याला सवलत मिळणार नाही व दुसऱ्यावाचून पहिले निव्वळ ढोग ठरेल जी लोकशाही खऱ्या लोकमताला मान देत नाही ती लोकशाही नव्हेच

आता मतप्रचाराची साधने कोणती व ती निरनिराळ्या देशात कशी वापरतात ते पाहू

अलीकडे रेडिओ, वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके, सिनेमा, सभा, मिरवणुकी हे मार्ग सर्वांच्या परिचयाचे आहेत, पण सघटित प्रचार का व केव्हा सुरू झाला, याचा इतिहास मोठा मनोरजक आहे

इग्लडमध्ये राजा व चर्च याच्यामध्ये अधिकाराबद्दल स्पर्धा सुरू

झाली काही लोकाचे म्हणणे असे होते, की राजाला चर्चवर पूर्ण हक्क आहे. तर विरुद्ध पक्षाचे लोक म्हणू लागले, की चर्चच्या व्यवस्थेत राजाला ढवळाढवळ करता येत नाही उलट चर्च सुद्धा काही बाबतीत राजावर सत्ता चालवू शकते या वादापासून जो तो आपापले म्हणणे लोकाना सभा भरवून पटवून देऊ लागला

आपल्याकडे सुद्धा कथा, कीर्तने, पुराणे हे ज्ञानप्रसाराचे पहिले मार्ग आहेत

नतर मुद्रणकलेचा शोध लागला आणि या एकाच शोधाने प्रचड क्राति केली सभेला फार तर दहा हजार लोक जमू शकतील किंवा अलीकडच्या प्रमाणे लाउडस्पीकर लावले तर वक्त्याचे भाषण पन्नास हजार लोक सहज ऐकू शकतील ! पण छोटया जाहिराती वाटल्या तर लक्षावधि लोक त्या वाचतात, दुसऱ्याला देतात आणि अशा तऱ्हेने लोकाच्या विचाराला चालना मिळू लागते. शिक्षणाचा प्रसारही झपाटयाने होऊ लागला व त्याबरोबरच वर्तमानपत्राना जास्त मागणी येऊ लागली कालातराने वर्तमानपत्राना इतके श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले, की आज इग्लडमध्ये त्याना ‘Fourth Estate of the Realm’ असे समजतात म्हणजे राजा, उमरावमडळ व खालचे विधिमडळ याच्या बरोबरीचा दर्जा वर्तमानपत्राना प्राप्त झाला आहे अर्थात् ही गोष्ट सहज घडलेली नाही त्याकरता अनेक लोकाना खडतर तपश्चर्या करावी लागली आहे अनेक तऱ्हेच्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, तुरुगवास सोसले, सर्वस्वाचे वाटोळे झाले तरी सुद्धा त्यानी आपला प्रचार चालू ठेवला नतर सरकारला त्याचा हक्क मान्य करावा लागला व आज लोकशाहीचे Freedom of Press हे महत्त्वाचे अग समजतात वर्तमानपत्राच्या सपादकाना वेळोवेळी अत्यत जबाबदारीची कामगिरी बजवावी लागते प्रत्येक गोष्टीचे लोकाना ज्ञान करून देणे, त्याचे मत तयार करणे व पक्षाची सघटना करणे, या गोष्टी वर्तमानपत्रानाच कराव्या लागतात लबाडया उघडकीस आणणे, सरकारच्या धोरणावर वेळप्रसगी कडक टीका करणे, हे कार्य वर्तमानपत्रानी बजावले पाहिजे वर्तमानपत्राचा सपादक विद्वान्, व्यासगी व बहुश्रुत असला पाहिजे तरच लोकमताला योग्य मार्ग त्याला दाखविता येईल. निव्वळ टीका किंवा स्तुति यामुळे कार्य होत नाही

इग्लडमध्ये सन १९३७ साली १,५७७ वर्तमानपत्रे व ३,११९ मासिके होती सन १९३४ मध्ये प्रत्येक शभर कुटुबापाठीमागे ९५ टक्के सकाळचे वर्तमानपत्र व ५७$\frac{1}{2}$ टक्के सध्याकाळचे वर्तमानपत्र घेत शिवाय १३० रविवारची पत्रे खपत यावरून लोक वृत्तपत्रे किती आतुरतेने वाचतात, हे दिसून येईल. दैनिक ९ वर्तमानपत्राचा एकूण खप १,०५,००,००० व १२ रविवारच्या पत्राचा खप १,५०,००,००० इतका १९३९ मध्ये होता. सध्या तर लढाईमुळे हा खप किती तरी पटीने वाढला असेल इतक्या वाचकाच्या मनावर त्या मजकुराचा परिणाम थोडा फार झाल्याशिवाय खास राहणार नाही.

बहुजनसमाज खोलवर विचार करीत नाही एक तर त्याना वेळ नसतो आणि तितके शिक्षण नसते म्हणून एकच बातमी ज्या विवक्षित स्वरूपात (colour) लोकासमोर माडलेली असते त्यावर बऱ्याचशा गोष्टी अवलबून असतात जो तो पक्ष आपापल्या धोरणाप्रमाणे एकच बातमी निरनिराळ्या मथळ्यात देतो

वृत्तपत्रानतर त्यात येणाऱ्या जाहिरातीचाही विचार अवश्य केला पाहिजे माल खपावा याकरता मालक जाहिराती देतात अर्थात् वाचक जरूर असेल त्या वाचतो पुष्कळ वेळा ते वर्तमानपत्र ज्या समाजात खपते त्या समाजाच्या नेमक्या गरजा ओळखून दिलेल्या जाहिरातीचा फार उपयोग होतो नाही तर वाचक जाहिरात वाचून फेकून देतो तेव्हा योग्य मालाची योग्य ठिकाणी जाहिरात करणे फार कौशल्याचे आहे अलीकडे तर हे एक स्वतत्र शास्त्रच तयार झालेले आहे.

यानतर सिनेमा-फिल्म्स तुम्ही एकादी इग्रजी फिल्म पाहावयास गेलात तर आधी १५–२० मिनिटे वार्तापट दाखवितात अर्थात् त्यातले प्रसग नेमके आपल्या फायद्याचे तेवढेच दाखवावे लागतात लढाईचा वार्तापट असेल तर शत्रूचे नुकसान व आपली तयारी दाखवावयाची, हा तर नेहमीचाच मार्ग आहे काही वेळा सबध फिल्म ही मतप्रचाराकरता काढलेली असते उदाहरणार्थ —'Confessions of a Nazi Spy', 'Hitler, the Beast of Berlin', 'Ninotchka' किवा 'ब्रँडीची

बाटली ' काही चित्रपट तर मुद्दाम काळ्या लोकाची बदनामी करण्याकरता काढलेले असतात वर्तमानपत्रापेक्षा अशा चित्रपटाचा परिणाम फार होतो.

हल्ली प्रत्येक स्वतत्र देशाचा प्रतिनिधि दुसऱ्या देशात वकील म्हणून राहिलेला असतो हा एक तऱ्हेचा अप्रत्यक्ष मतप्रचारच आहे आपल्या सरकारबद्दल बाहेर सहानुभूति निर्माण करावयाची, एवढ्यासाठी प्रत्येक देशाचे सरकार लक्षावधि रुपयाचा खर्च करते हे प्रतिनिधी पुस्तकाच्या द्वारा अथवा वर्तमानपत्राना पैसे देऊन मतप्रचार करतात आपल्या कॉंग्रेसने मागें स्पेनला मदत पाठविली, प जवाहरलाल चीनला गेले त्यात सुद्धा हिंदुस्थानबद्दल इतराची सहानुभूति मिळवावी हा हेतु होताच श्री सुभाषबाबू यानी लिहिलेल्या 'Through Congress Eyes' या पुस्तकात 'India Abroad' या लेखात या गोष्टीची सुदर चर्चा केलेली आहे

अगदी अलीकडे रेडिओ तर सर्वांनाच परिचयाचा आहे. बातम्या, भाषणे ही तर उघड उघड मतप्रचारासाठीच असतात जर्मनी-इग्लड यातून कित्येक वेळा कशा परस्परविरोधी हास्यास्पद बातम्या येतात, हे पाहिले म्हणजे सामान्य माणूस बुचकळ्यात पडतो

आपण हे जे निरनिराळे प्रकार पाहिले ते सर्व आपल्या थोड्या फार परिचयाचे आहेत आपल्याकडे जबाबदार सरकार नसल्यामुळे या गोष्टीचा व्हावा तसा फैलाव अजून झालेला नाही, पण साक्षरता-प्रसार, शिक्षण व राहणीचा दर्जा जसजसा सुधारत जाईल तसतसा या गोष्टीचा झपाट्याने प्रसार होईल अजून आपल्याकडे वर्तमानपत्र विकत घेणे ही चैनीची बाब समजली जाते कारण आमचा जगाशी काही सबध आहे असे आम्हाला वाटत नाही जसजसे सरकार लोकमताला जबाबदार होत जाईल तसतसे लोकानाही आपल्या नागरिकत्वाच्या हक्काकडे जास्त लक्ष द्यावे लागेल ते जास्त हक्क मागू लागतील व म्हणून बारकाईने सरकारच्या प्रत्येक कृत्याचे परिणाम तोलून, मोजून पाहू लागतील

या गोष्टी जितक्या झपाट्याने होतील तितका वृत्तपत्राचा उज्ज्वल काळ जवळ येईल

मतप्रचाराचा प्रत्येकाला हक्क पाहिजे मात्र प्रत्येकाने आपली

जबाबदारी ओळखली पाहिजे बेजबाबदार टीकेचा परिणाम फक्त अनर्थ होतो टीकेने योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे

सन १९३१ मध्ये इग्लडने सुवर्णचलन सोडले त्या वेळी रॅम्से मॅकडोनाल्ड यानी सपादकाच्या सभेत खालील महत्त्वाचे उद्गार काढले —

'आमचा वृत्तपत्रावर काही अधिकार नाही, किवा खरे बोलावयाचे तर आम्ही वृत्तपत्रावर कोणत्याही तऱ्हेचा अधिकार गाजवू इच्छित नाही. तुम्ही ही बातमी ( सुवर्णचलन सोडल्याची ) उद्या लोकासमोर ज्या तऱ्हेने माडाल त्यावर सर्व गोष्टी अवलबून आहेत त्यामुळे लोकाना उद्या आर्थिक धक्का बसेल, किवा दगेधोपे होतील किवा लोकात पूर्ण शातता व विश्वासाचे वातावरण दिसून येईल सद्गृहस्थहो ! उद्या सरकार सर्वस्वी तुमच्या हातात आहे [We have no power over the press, or—shall I say ?—We do not wish to exert any power over the press According to how you represent this news to the public tomorrow, there will be financial panic, and food riots and that kind of thing, or else there will be calm, confidence and even a feeling that better times are at hand Tomorrow gentlemen, the Government of the country is in your hands ]'

कित्येकाना हे उद्गार अतिशयोक्तीचे वाटतील पण ते एका जबाबदार पुढाऱ्याने उच्चारलेले आहेत हे लक्षात घेतल्यावर त्याचे महत्त्व कळून येईल यावरून वर्तमानपत्रे ही केवढी प्रचड शक्ति आहे हे दिसून येईल त्या शक्तीचा आपण योग्य उपयोग केला पाहिजे

—चित्रमय-जगत्

---

या लेखातील आकडे व थोडी माहिती *R S. Lambert* याच्या 'Propaganda' या पुस्तकातून घेतली आहे

# १

# तरी मीं म्हटलं होतं . . . !

"समजलं कां तुम्हांला ?....अजून बातमी नाही कळली ?.... म्हणजे असे कसे तुम्ही—सगळया गांवांत झाली ना ती आतां ?.... अहो, आपल्या गोपाळरावांचा बापू नापास झाला....पाह्यलांत का रिझल्ट....हा पहा....तरी मी म्हणत होतो....अशी पोरं का पास व्हायचित् ?....मग उद्यां युनिव्हर्सिटीला दिवाळं काढावं लागेल....अरे परीक्षेच्या दिवसांत सिनेमा!....तेव्हांच ओळखलं! अन् म्हणे फर्स्ट क्लासांत येईन....बसा वाजवीत म्हणावं....कोण आलंय् ?....वा वा ....बापू तुझ्यासंबंधीच बोलतोय् रामभाऊशी!....बैस स्वस्थ आतां ....पुरे झाली ती परीक्षेची दगदग! आतां निश्चिंतपणान विश्रांति घे!....बरं आतां पुढं काय करायचं ठरवलंयस् ?....बाकी निकाल सुद्धां अवघड आहे यंदां....हल्ली या परीक्षा म्हणजे कत्तल करतात नुसती पोरांची ?....मूर्खांनी बसावं परीक्षेला पुन:पुन्हां....हे रे काय ?....पेढे कसले ?....काय पास झालास ?....वाहऽवा!....अन् नांव नाही दिसत ?....नांव चुकलंय् म्हणतोस ?....तरी वाटलंच मला

....पहा रामभाऊ....अरे गोपाळरावांचा मुलगा! तूं का नापास होणार?....ह्यः ह्यः ह्यः....आधी पेढे खाऊ दे....अन् आमच्या घरीं निराळे आले पाह्यजेत हं!....अरे आमच्यासारख्याचे आशीर्वाद पाह्यजेत....तरी मी युनिव्हर्सिटीला तार करणार होतो....तुझं नांव नाही म्हणजे काय?....हुषार आहेसच तसा तूं!....तरी मी म्हटलं होतं....अरे तूं पास झालाच पाहिजेस!!"

—ज्योत्स्ना.

# २

# थोडक्यांत चुकलं.....!

"म्हणजे शंका आहे का?....उत्तम म्हणजे काय प्रश्नच नाही....परवां टाइम्समध्ये फोटो आला होता तो पाह्यला नाहीत वाटतं?....अगदी बरोब्बरचेच ना आम्ही....म्हणजे तसा मी सीनिअर त्याला....शाळेत असतांनाच भविष्य केलं होतं—तेव्हां आता पच-रंगी सामन्यांत खेळतेय् स्वारी....काय मानमरातब मिळतोय् पाहिलंत ना!....मित्र असावा तर असा....म्हटलच आहे 'A man is known by the company he keeps' मग?....परवांच चहाला गेलो होतों ....जातो आपला मधून मधून....त्याला कुठला वेळ व्हायला आमच्याकडे यायला?... शिवाय थोडया थोडया instructions ही देतो....म्हणजे तुम्हाला ठाऊक नाही वाटत?....वा महाराजे!.... शाळेच्या टीमचा कॅप्टन् होतो ना मी!.... ...तेव्हां याला पॅट घालायला येत नव्हती....माझ्यापासून शिकला सार—तेव्हां हार-तुरे, फोटो....उगीच का आहे?....रिझर्व्हमध्ये कां होईना पण अगदीं मागं लागायचा... पण बाब्यानं कधी मोपळा फोडला असेल तर

शपथ !....लहानपणचं सांगूं लागलो....पण विश्वास बसायचा नाही आतां कुणाचा....आँ....हो ते देखील खरंच....विलायतेत असा खेळाडू असता तर कोटयवधि रुपये अन् जगभर कीर्ति मिळवली असती....पण आपल्या या दरिद्री देशांत जन्मायचं पाप केलं नं ! —सगळे गुण मातिमोल ठरतात इथं—सांगितलं तर हंसाल—पण आम्ही सुद्धा त्याच्या सवाई पुढं गेलों असतो....पण सांगितलं ना ! ....जर का तिकडे जन्मलो असतो....हं जाऊं द्या झालं आठवण सुद्धां नको....अगदी थोडक्यांतच चुकलं ते ! ”

—ज्योत्स्ना

# ३

# चेष्टा समजतां काय ...... ?

" कसलं लिखाण घेऊन बसलांत ?....अहो लिहिलं तर चाट् व्हाल !....अन् इथ वेळ आहे कुणाला ?....काय म्हटलंत ?.... एकदां लिहूंच ?....सांगितलं ना तुम्हांला, की आम्ही लिहीत नाहीं तोपर्यंत सगळं !—एकदां लिहूं लागलो की सगळयांना लेखण्या मोडाव्या लागतील !....मग उगीचच कॉम्पिटिशन हवी कशाला ?.... या ललित वाङ्मयांत आहे काय ?—कुठे लघुनिबंध, लघुकथा, सुनीतं, नाटकं, कादंबऱ्या—हॅट—शॉ, गाल्सवर्दी, गॉर्की वाचा म्हणावं एकदां....कुठं तो टॉल्स्टॉय, अप्टन सिंक्लेअर....नाही तर लिहितात हे !—पत्रांचा ढीग पडलाय् संपादकांच्या....एका लेखाला आगाऊ पंचवीस द्यायला तयार आहेत—चेष्टा नाहीं करीत, खरंच सांगतो !....आम्ही लिहीत नाही तोपर्यंत....हें कसलं लिखाण ?.... बुधवारांत पहायचं अन् गुरुवारांत लिहायचं !....लहानपणीं लिहीत होतो....पण वडिलांनी एकदां अस बडवलं....तेव्हांपासनं परीक्षेच्या पेपराशिवाय कांहीं लिखाण नाही....म्हणून तर आमचा दर्जा असा

आहे....नाही तर तो ...खरडतोय् सारखं! अभिप्राय लिहिला पुस्तका-वर तर फॅ फॅ उडेल....कां लिहीत नाही म्हणतां ? सांगितलं ना, की त्या पातळीवर यायचं नाही!....पत्र दाखवूं म्हणतां ?....काय दुर्दैव—कालच कपाटाची किल्ली हरवली....पुस्तकं ? वा!.... मराठी ग्रंथालय, नगर वाचनमंदिर पाहिलं नाहीत वाटतं ?.... कॉंटिनेंटल ठाऊक आहे कां ?....फुकट गेला जन्म! ती वाचली का तुम्ही गोष्ट ?....हो लिहितो तसा किरकोळ किरकोळ....पण कधी प्रसिद्ध झालेलं दिसायचं नाही....नाही तर सायकलवर टांग टाकली की चालले!....हे सगळं कपाट हस्तलिखितानं भरलंय्.... एकदां मारा चालवण्याचा अवकाश....बेशुद्ध व्हाल म्हटलं!....असे आहेत एकेक लेख!....मग काय चेष्टा समजतां ?"

—मन्वन्तर

# ४

# नवीन जागेंत या .. !

" आतां नवीन जागेतच या !—महिनाअखेर सोडीन ही.... नक्की ठरलं नाही अजून—भाड्याच्या बेतानं पाहायचं !....काय ठीक चाललंय् ना ?....माझं बरंय् की ! ..नवा साहेब म्हणतां होय ?.... आहे, बरा आहे, अहो आम्हाला काय कुणाच्या तरी हाताखाली वागायचंय्—मग कुरकुर कशाला ?....हे का ?....अरे हो तुमची ओळख करून देतो हं !....हे रामभाऊ गोखले मास्तर आमच्या शेजारीच राहतात, अन् हे पटवर्धन पब्लिक अकौंट्स्‌मध्ये असतात.... आमची अन् पटवर्धनांची फार दोस्ती बर का रामभाऊ !....बरय् पटवर्धन !.... अच्छा....काय म्हणतां रामभाऊ ?.... याला घरी नेऊं ?....कराचयं काय ?....एक नंबरचा कुचका आहे !....अन् आमची जागा कशी आहे ते माहीत आहे नं ?....भाडं देऊन अंधारकोठडीची शिक्षा !....दोन खोल्यांत चार माणसं !....घरी बोलावलं तर आंत सुद्धां यायचा नाही....भारी घमेंड ...अलीकडे साफ ठरवूनच टाकलंय्....कोणी म्हणाला घरी येतो की जागा बदलतोय् असं सांगा-

यचं !....आपली झांकली मूठ सव्वा लाखाची....दारिद्र्याचं प्रदर्शन हवं कशाला ?....दुसरी जागा घेऊं म्हणतां ?....पैसा ?....चाळीस रुपयात चार तोंड ! ओल किती आहे पाहतांच ना तुम्ही ?....त्यामुळें आईचे सांधे धरतात....कसली नवी जागा अन् काय ?....एकदां जाणार आम्ही चांगल्या मोठ्या जागेत !....सगळ्यांना शेवटी जावं लागतं तिथं ! ! ”

—झारापकर

५

# सगळा रिट्रेंचमेंटचा परिणाम ........ !

"काय सांगायचं ?....सर्व्हिसला लागून बारा वर्षे व्हायला आली होती!—पण आतां कोण विचारतो ?....नोकरीवर असतांना काय काय मनोरथ केले होते....पण आतां उपयोग काय ?—बंगला बांधायचा म्हणून प्लॉट सुद्धां ठरवला....पण कुणी एक पैसा तरी कर्ज देईल कां आतां ?....तेव्हांचा रुबाब गेला!....शेजारी पाजारी सुद्धां विचारीनासे झाले ना!—नोकरी सुटल्यापासनं एकदां सुद्धां कोणीं चहाला बोलावलं नाही....अन् तेच मी नोकरीवर असतांना छपन्न वेळां माझ्याकडे चहा प्यालेत....असं असतं जगांत!....चालत्याचे सगळे!....घर-मालक इतके दिवस किती सज्जनपणानं वागायचा; पण तो सुद्धां आतां आगाऊ भाडं मागूं लागला!....मागं दोन दोन महिने भाडं थकलं तरी कधीं ब्र काढला नाही....असं आहे....वाणी सुद्धां खातं ठेवायला तयार होईना....त्याला सुद्धां ही बातमी कळली ....पाहालंत ना!—वाईट बातम्या लवकर पसरतात....शिंप्याचे मागचे कांही थोडे पैसे द्यायचेत, चार वेळां पोरगा पाठवला. अन्

मागं मी बिल मागायचा तरी म्हणे राहूं द्या हो, जातंय् कुठं!—पाह्यलंत ना सरकारवर किती विश्वास आहे तो?....जवळचे नातलग आतां ढुंकून बघत नाहीत—आतां या पोरीचं लग्न तर करायला हव?....घरांत किती दिवस ठेवायची?....आतां तुम्हीच सांगा.... काटकसर तरी कुठं करूं?—विजेचे दिवे बंद करून कंदील आणले ....मागे कोळशावर स्वयंपाक करीत होतो, आतां लांकडावर करतो! —विमा उतरलाय् त्याचा हप्ता पुनः बोकांडी आहेच!....अन् ही शहरी राहणी—किती महागाई झालीय् सध्या!—बरं खेडेगावांत का आपल्याला जातां येतय्? अहो पुढाऱ्यांना काय होतं खेड्यांत चला म्हणून सांगायला?—अन् खेडेगांवांत पोरांनी शाळेत कसं जायचं? ....पण या अडचणी कोण बघतोय्?—कांही काही वेळा तर हे सगळं सोडून सन्यास घ्यावासा वाटतो!—कुठं तरी जाऊन काळ करावं!—इतका संताप येतो जिवाला....पण या पोरांकडे पाह्यलं म्हणजे उचबळून येतं!—कसं होणार?....नको हे अपमानास्पद जिणं!....म्हणे काटकसरीन वागावं!—सरकारची काटकसर आम्हांला भोवते!—त्यांचे अधिकारी दहा दहा हजार रुपये मलिदा घेतात ....ही डोळ्यांदेखत लूट चाललीय् ती दिसत नाही, अन् आमच्या सारख्या गरिबांचे काळ....काय न्याय आहे?....इतकी इमानानं नोकरी करून पुनः काय?....आम्ही जगांत मूर्ख ठरलो!....हा सगळा रिट्रेंचमेटचा परिणाम बरं!"

*—महाराष्ट्र-शारदा*

# ६

# तरी चाललं असतं . . . !

"ओऽहो....कुणीकडं इकडं?—अन् अगदी अचानक! ...पत्र तरी पाठवायचं यायच्या आधी....अन् सामान दिसत नाही कुठं? ....झोन काढलंत वाटतं?....छान!—एकटेच निघालात?....बाकी उन्हाळा कोण आहे!....बरी आहेत ना सर्व?... हा मात्र अगदी अलभ्य लाभ आहे तुमचा....किती दिवसांनी भेट होतेय्!....म्हणजे चार वर्षं तरी सहज झाली असतील... पण घर कस सापडलं आमच तुम्हांला?....तांगेवाल्यानं आणलं म्हणतां?....आहे तसा थोडा प्रसिद्ध मी!....फार गर्दी असेल ना प्रवासात—अन् रात्री तर विचारूं नका....तुमची आमची गांठ पडली म्हणून बरं, मीही आजच बॉंबेला जाणार आहे....लागतील तिथं तीन चार दिवस!—बरं, आतां पुढं कुठं जाणार?....कोल्हापूर का? छान!....या दिवसांत कोल्हापूर म्हणजे महाबळेश्वर!....मुक्काम थोडाच असेल तुमचा? ....आहे काय आमच्या या भिकार गांवांत?....आतां नोकरीनिमित्त आम्हांला इथं राहावं लागतं!....थांबा हं, चहा सांगून येतो.... हं,

मग तुम्ही 'परमनंट' झालांत तर ?....काढा कपडे....म्हणजे ?.... अहो अघोळ नाही का करायची ?....काय म्हणता, त्या सुरतकरांकडे उतरलांत ?....वा वा वा !—हें नाही बरं केलंत !....इकडे इतकं सत्तेचं घर असतांना तिकडे कशाला ?....गड्याला सांगतो सामान आणायला इकडे....बरं जाऊं द्या....आतां कांही इलाज नाहीं....पण पुन्हां याल तेव्हां इकडेच आलं पाहिजे हं ! ...अन् वहिनींना सुद्धां घेऊन या....नाही तर रागावूं आम्ही....बाकी सुरतकर देखील सज्जन माणूस ! ...कोणीही याव जावं त्याच्याकडे ...अगदीं माणसातला आहे बिचारा !....नाही, नाही तिकडे उतरलात म्हणून कांही बिघडत नाही....पण म्हटलं इकडे आला असतात तरी चाललं असतं !"

—समर्थ.

# ७

# उगीच नाहीं—अनुभवाचं आहे ...... !

" हो हो....अगदी प्रत्यक्ष केलेली गोष्ट सांगतोय् !....मग ?.... अहो तो घेलाशेट—हो....त्याच्या घरावर दरोडा घातला....कैक दिवस पोलिसांना पत्ता लागला नव्हता....पण शेवटी आमच्यांतलाच तो गेन्या फितला—अहो आमचे लोकच हलकट....अस्सं फितूर होऊन राज्य घालवलं....एकीच नाही आपल्यांत ...अन् त्या खटल्यांत मी दोन वर्षं गेलो....पण मी कसला वस्ताद....दोन दिवस तुरुंगांत राहिलो असेन तर तुमची शपथ....देवाच्यान् खरं सांगतोय्....पुढं आमच्याच गांवच्या फौजदारानं पकडलं !—याच फौजदाराला मी किती वेळां तरी चिरिमिरी अन् चहापाणी दिलं होतं....पण त्याला बढतीची आशा—मी त्याच्यापेक्षां जास्त पैका दिला असता....पण म्हण आहे ना कीं—घर फिरलं म्हणजे घराचे वासे देखील फिरतात.... आपलं दुर्दैव....दुसऱ्याला कां बोल लावावा ?—त्या खटल्यांत शिक्षा भोगून सुटल्यावर एकाचा खिसा कापला....काय शिताफीनं खिसे कापतो मी....पण आपल्याकडं गुणाचं चीज होतंय् कुठं....

परदेशात खिसेकापू गळेकापू शिप्याना पदव्या देतात....त्यांना तिकडं मान मिळतो....बर हं....काय सांगत होतो ?....अहो मी किती खून पचवलेत् कल्पना नाही यायची तुम्हाला....पण अजून पोलिसाना पत्ता नाही....आज लढाई सुरू असती तर गुप्त हेराचं काम केलं असत—पण संधि आहे कुठ....माणसाच्या अगातले गुण असे वांया चालले‍त बर....एकदां एका साहेबानं सुद्धां मला शाबासकी दिली. ..फार वर्ष होता तो हिंदुस्थानांत . सगळे कैदी त्याला चळचळ कापत पण माझ्यापुढे हात टेकावे लागले त्याला तो सुद्धां चाट झाला माझ्या करामती पाहून . त्याचं सुद्धा डोकं चालेना माझ्या युक्त्यापुढं. ..आहात कुठं राव !—मला आठ पोलिसाच्या पहाऱ्यात न्यावं लागे बर .इतरांना दोन म्हणजे जास्त .काय सांगायचं आतां !. .ती ताकद काही राहिली नाही तरुणपणाच्या गोष्टी आहेत महाराज या ! अरेरेऽ गेले ते दिवस . .अजून आठवलं कीं भडभडून येत .ती ताकद गेली लहानपणी काय उत्तम पोहायचा, मी एकदां पोलिसाचा डोळा चुकवून पूर आलेल्या नदीतनं पार झालो. ..एकदा एका बाईची नथ विहिरीत पडली. . कुण्णी उतरायला तयार होईना .मी ती बाई गेल्यावर नथ काढली पधरा रुपये आले तिचे .आपलं काय वाईट झाल . ! . . .शंभराचा माल पधराला तरी गेला म्हणून बरं ? आणखीन् कैक गोष्टी सांगण्या-सारख्या आहेत . फार जग पाहिलंय् मी... पुष्कळ हिंडलोंय् ... उगीच नाही—अनुभवाचं आहे . ! ! ”

—दरव.

# ८

# मग जाऊं द्या .. !

"काय म्हणतां ?....मुलगी सापडली मोटारखाली ? अरेरे पाहू पाहूं चला....फारस लागलं नाही नं ?....काय पोटावरून गेली मोटार ? हरे राम !....काय कराव या पोराना....अन् आईबाप बिलकुल लक्ष देत नाहीत....बाजूला व्हा पाहूं जरा....अरे ही तर सोनू !.... आमच्याकडे ती भिकारीण नाही का येत—तिची मुलगी हो. .. एकुलती एकच होती बिचारीला ! शेण गोळा करायची अन् आईला नेऊन द्यायची . वाईट झाल फार . आता आमच्याकडे शेण कोण टाकणार ? फार दिवसांची होती हो ही आमची ! शिळंपाकं दिल तरी किती आनंद व्हायचा तिला ! नाही तर अलीकडे लोक काय माजोरी झालेत् !—चला झालं. काय म्हणतां मी जाऊं पोलिसला बोलवायला ? . करायचंय् काय मला ?... अन् मोटारवालाही गेला नं—बाकी गरिबांचं वाली आहे कोण जगांत ? . काय त्या मोटारवाल्याचा तरी दोष ? ...ही कार्टी गेली कशाला मधे ?. ..काय तो दारू प्याला होता ? .. जाऊं द्या.. .सुटली

बिचारी ! बोलून चालून भिकाऱ्याची मुलगी ती, अन् तिच्याबद्दल हो काय करायचाय् पोलिस अन् कोर्ट ? ...मग जाऊं द्या की कशाला उगीच त्याची पंचाइत आपल्याला !! "

—सह्याद्रि.

## १

# त्यांत काय भ्यायचंय् . . ?

" तिथं गेलाय् होय ? .. इकडून ढोसा . अस्स !. मारा दगड—केवढा आहे ? . दोन हात ? अन् बराच जाड आहे म्हणता ? इतकाच ? . हात्तिच्या !. ..आमच्या गावी तर याच्या दस-पट मोठे निघतात ! घाबरता का ? . त्यात घाबरण्यासारखं आहे काय ? जरा जोरानं ढोसा . भिऊं नका अगदी आला का ?.... आल्याबरोबर ठोका तुम्ही कागद पेटवून टाका तिथ की धुरानं आत्तां बाहेर येईल !—बस्स ! ही घ्या काडयाची पेटी काठी नीट धरा हं ! छे छे . अगदीच भित्रे बुवा साधी काठी धरता येत नाही ! साहेबांनी अगदी नामर्द बनवलंय् आपल्याला ! काय करायचं शिकून ? साधा साप मारायला येत नाही ! शिवाजीच्या काळी मावळ्यानी कसा पराक्रम गाजवला तिकडे बघा बरं कां नाही तर निसटून जायचा . मी कशाला हंवाय् जवळ आणखी ? ... गर्दी करून करायचं काय ? . दिसला का ? लगवा टोला ?. .. ऐसा . .यंव !.. माझी छत्री उगीच मोडेल. विषारी कुठला ?....

या बाजूला कुठले विषारी साप ! कोकणांत चला एकदा—चावला की तिथंच थंड !....येत नाही कां बाहेर !.. .आला ?. . मारा मारा ....ठोका ठोका. . बस्स बस्स तोंड चांगलं ठेचलंत् न ? .. पाहू अजून शेपटी वळवळते आहे ..थांबा हं, चांगलाच काढतो आतां ....म्हणजे सोडतों होय त्याला तसा जिवंत ? अगदीच किरडुं आहे अन् म्हणे मोठा आहे . हॅ एवढयाशा किरडाला हो काय भ्यायचं ! . लहान पोर सुद्धां मारील असलं किरडू . . !"

*—स प कॉलेज मॅगझिन*

१०

# वाईट झालं फार ...... !

" वारले ?....खरच का ?....छे ..खरं सुद्धा वाटत नाहीं !— काय कल्पना असण्याच कारण ?....परवा नेहमी सारखं बोलणं— चालणं झालं—हार्ट फेल झालं ?...काय योग तरी !....फार सज्जन बरं....एकेक आठवणी येतात आतां !....माणूस गेल्यावर खरी किमत कळते ...वाईट बोवा....! स्वभाव किती निःस्पृह ! कधी कुणाच्या पैला शिवायचा नाही—न्यायाधीश असावा तर असा ! नाही तर इतर पाहतोच की—साहेबलोक सुद्धा चळचळा कापायचे....न्याय म्हणजे न्याय !. कुणापुढे लागूनचालन खपा-यचं नाही ...नाही तर हायकोर्टात बसण्याची योग्यता होती बरं का !....कामाचा उरक तरी किती ! . कां हो गप्प कां ?— बाकी या वेळेला काय बोलणार माणूस ? ...ज्याला त्याला अंतः-करणांत ठाऊक !. ..काय म्हणतां ?... तुमचा अनुभव वाईट आहे ?.... शाब्बास ! ...तुम्हीच पहिले दिसता असे ! नाही, नाही रागावू नका....पण म्हटल तुमच्यासारखे स्पष्टवक्ते सुद्धा क्वचित् !....नाहीं

तर इतर बोलतात तसे आपण बोलले . तुम्हांला नोकरी दिली नाही ? . चिठ्ठी सुद्धा पाहिली नाही ? ..‘ वशिला उपयोगी नाही ’ म्हणाला काय ? ..काय गृहस्थ बुवा ! .. अन् म्हणे निःस्पृह ! .. हा कसला निःस्पृहपणा ?....व्यवहार पाहिजे थोडा माणसाला .. लोक पैसे देतात ते मूर्ख अन् हे तेवढे शहाणे ! ..पण सत्तेपुढं शहाणपण नाही—पहा तुम्हीच एकाच माणसाबद्दल किती विविध अनुभव असतात—अहो ज्याच त्याला ठाऊक !... बाकी तो माणूस तसाच बरं का ! ..तुम्हांलाच काय पण इतराना सुद्धा बंगल्यावर फिरकूं द्यायचा नाहीं—ऑफिसात सगळ ! ...मी काय करतो म्हणता ? . .एलएल्. बी होऊन तीन वर्षं झाली, आतां ‘ ज्युडीशिअल ’—कडे खटपट चाललीय् . आपले तात्याच शब्द टाकणार होते—बाकी पिकल पान ! ...पण एवढं माझं काम झालं असतं म्हणजे ..शेवटी तुम्हांला नोकरी नाही लावली म्हणता ? . . वाईट झालं बर का ते....खरोखरच वाईट झाल ! ”

—अग्रणी.

# ११

# पुन्हा सांपडायला पाहिजे होता—

" अरे असा कसा रे मूर्ख तू ?—चागल हाती आलेल सावज सोडलंस ! ऑ ! ! आता काय म्हणावं तुला ?... अगदी अब्रू जायची वेळ आणलीस काय ?—हो हो माझ्यावर ढकलतोय् आणखीन् अरे, चागला सापडलेला दरवडेखोर पळाला....आता काय राहिलं ? .. पांचशें रुपयांचं बक्षिस गेलं ना हातचं . मग ?.... अरे, तूं धरलास म्हणून काय झाल ? साहेबाला सागून तुला एकदम फौजदार केलं असतं .अन् मी झालो असतो पोलिस सुपरि-टेंडट.. असा कसा गाढव रे तूं ! आतां काय ?—कपाळ— तो कासीम माझ्या वाईटावर आहेच माझ्याबद्दल साहेबांजवळ नसतं काही तरी सांगितल म्हणजे 'डिसमिस' व्हायची वेळ येईल न !.... ऑ ! . अरे, तुझा मूर्खपणा मला भोवतोय्. मागं एकदां तसंच झाल ...तो खुनी . हं. . अरे, तो गुलाब नव्हे—तो... अरे तो रे . . हं . तो अबदुल्ला ..त्या वेळी त्यानं माझी चागलीच फजीति केली .थोबाडीत देऊन पळून गेला की....मग ?....आतां हें साहे-

बाला कस सागायच ? साहेब माझी किंमत करील ना . मग ?. .. असे कसे मूर्ख लोक ? ऑ !... बर, ते राहू दे. . पण तो पळाला कसा. काय ?. नं झोपला होतास !.. वा ! !. बरं मग ?— तुझ्याजवळची किल्ली त्यान खिशातन हात घालून घेतली होय.... वाहवा . अन् इतकं सुद्धा तुला कळलं नाही ? अरे, काय माणूस आहेस का—! ! !—आता साहेब इन्स्पेक्शनला येईल तेव्हा काय सागू ?. . अरे, माझ्या सर्व हयातीत मला कधीं अशी संधि आली नव्हती .अन् ती तू वाया घालवलीस ? अरे तू त्याला पकडलस म्हणून काय झाल ?. . तू अन् मी निम्मं निम्मं बक्षिस वांटून घेतलं असत .. आतां काय करायचं ?—बर असो तो अजून सापडू दे म्हणजे दाखवतो . अस भित्र्या भागुबाईसारखा पळतोस काय— म्हणावं ? ...समोर ये .पण काय करायच. पुन्हां सापडायला पाहिजे होता, म्हणजे दाखवल असत. . ! ! !

—विहार

# १२

## परोपदेशे ... .. ?

" संतांनीच म्हटलं आहे ना ?. . परोपकाराय .म्हणून तर आमच्यासारखे जगलेत् !—बाकी तो मनुष्य और हं पांच रुपये त्याला उसने देवेनात् ..किती तो गृहस्थ पाया पडून मागत होता.... पण याला कांही पाझर नाही ..अन् मागन तो गृहस्थ गेल्यावर मला म्हणाला काय म्हणे त्याच्याकडनं आधीचे दोनशे यायचेत् ! .. म्हटलं आणखी पांच वाढले असते, बिघडलं कुठं ?. बरं ते जाऊं द्या—पण एक दिवस त्याची नवी सायकल मागितली.. .म्हटलं पाहूं तरी कशी काय आहे ती ..तर चक्क सांगितलंन् की पंक्चर आहे म्हणून तसाच तो रामभाऊ—एकदा पोरगं फार रडत होतं म्हणून ग्रामोफोन मागायला गेलो तर म्हणे पिन्स संपल्यायत्.... मीं म्हटलं तुझ्यापेक्षां सवाई फोनो आणीन... अ ? काय म्हणतां ?.... हं हं ..नाही आणला नाही अजून—विलायतेहूनच एकदम मागवावयाचा विचार आहे ...नाही तर आतां रेडिओच जास्त प्रचारांत आलेत ग्रामोफोन औट ऑफ फॅशन झाले—तेव्हां एकादं रेडिओचंच मॉडेल घेईन.. .कुणाला अशा गोष्टी सांगितल्या तर लोक मलाच निंदक म्हणतील ? ..पण तुकोबा महाराजांनींच

म्हटलं आहे ना ‘ निदकाचे घर . ’ ह्यः ह्य ...त्याला देखील अस्सा शेजाऱ्याकडून त्रास झाला बरं ! .अन् म्हणूनच ती ओळ लिहिली—सिनेमांत दाखवतातच की ते सगळ !—फार कशाला पण आमच्या त्या सातपुत्याला त्या मद्राश्यान प्रमोशन दिल अन् आम्ही बसलो वाजवीत !.. .आणि उत्तर काय म्हणे ‘ Your work is not satisfactory ’ . काय कळतय् हो त्याला ? कोण आलंय् रे गोपू बाहेर ?... गोविंदा का ? अरे त्याला सांग मग दोन तीन दिवसांनीं यायला अरे आम्ही पळून का जातोय् ? म्हणे दोन महिन्यांचा पगार राहिला .अन् ही सकाळची वेळ का रे पैसे मागायला यायची ? हो हो म्हणे मी सागितल्या वेळी आलोय् ... मोठा करेक्ट मला ठाऊक आहे ! नोकरीवर कधी वेळेवर यायचा नाही पण पैसे सागितल्या वेळेला मागायला तयार ! उद्यां ये जा ! ..पाहिलंत .अहो त्याचं कसल खर मानता—आमच्या घरी नोकरीला होता हा अन् एक दिवस दोन महिन्याचा पगार थकला म्हणून चक्क निघून गेला . एक महिन्याची नोटीस तरी द्यायला नको का ? पहा आतां तुम्हीच—नोकऱ्या तरी आहेत कुठं ? ..पण बोलून चालून मोलाची माणस ही कोण आहे ? .. या ..Excuse हं स्पष्ट सागायच जीवावर येतं पण तुमच्या संस्थेला मला मदत देतां यायची नाही . काय म्हणतां लोकाश्रयावर चाललीय् तुमची संस्था ?.. अहो मग गांवांतले इतर लोक कांहीं मेले नाहींत !—चूचूच् काय अवस्था आहे या सस्थांची ?—एक पै देखील लोक मदत करीत नाहीत ..तरी मी प्रत्येक व्याख्यानांत सांगतों बाबांनो दुसऱ्याच्या उपयोगी पडा ! ”

—ज्योत्स्ना.